एम. डी. जोशी

# शिवराज

१९८४

# 'शिवराज'

नियतकालीक १९८४

## शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज.

● ●

**संपादन – समिती**

**अध्यक्ष :**
प्राचार्य बलवन्त देशमुख

**प्रमुख संपादक :**
प्रा. गजानन गुळवणी

**सह-संपादक :**
प्रा. सौ. सुहासिनी जगताप
प्रा किसन केसरकर
प्रा. विष्णू सुरंगे

**जाहिरात विभाग :**
प्रा. सी. एस. गवसणी
प्रा. एन. डी. खिचडी
प्रा. एस. बी. कडूकर



**कला :**
प्रा. चंद्रहास धुमाळ

**मुद्रक :**
झुंजार प्रिंटींग प्रेस, निपाणी.

● ●



कर्मवीर कै. विठ्ठल रामजी शिंदे

संस्थापक – अध्यक्ष



खासदार बाळासाहेब माने

उपाध्यक्ष गव्हर्निंग कौन्सील



मा. डी. एस. कदम



प्राचार्य बलवंत देशमुख

# 'संपादकीय'....

या वर्षीच्या शिवराजवर काळया चौकटीचे सावट जाणवत आहे. खरं म्हणजे उत्साह, चैतन्य व जोश यांचं उधाण हाच आयुष्यातील वसंताचा भाग पण एकसारखे दु:खाचे आघात कानावर आदळत राहिले त्यामुळे संकल्पाप्रमाणे शिवराजला हवा तो आकार देऊ शकलो नाही. याचे कारण सारे संकल्प दु:खाच्या धुक्यातच विरले. प्राचार्यांचा प्रेमळ आग्रह सहसंपादक प्रा. सौ. सुहासिनी जगताप, प्रा. किसनराव केसरकर व प्रा वि मा. सुरंगे यांनी मनापासून साथ केली त्यामुळेच हा वर्षांक सजला आहे.

ज्यांनी आपल्या प्रतिभेचे उन्मेष 'शिवराज'साठी दिले त्या सर्व मानकऱ्यांचे मन:पूर्वक कौतुक.

आमचे अधिक्षक श्री. जयंत सबनीस, अकौंटंट श्री. मोहिते व ग्रंथपाल श्री. टी. ए. पाटील यांनीही वेळोवेळी आपले सहकार्य देऊ केले त्याबद्दल त्यांचे आभार.

नेहमीप्रमाणे आर्थिक आघाडीवर प्रा. गवसणे व प्रा. खिचडी हे सलामीच्या फलंदाजांप्रमाणे अग्रभागी राहिले त्यांना साथ दिली प्रा. कडूकर, जी. एस. श्री. सुरेश पेडणेकर, यु. आर. विक्रांत गुरव, अशोक मोहिते व किरण कदम यांनी. सामाजिक भान ठेवून आपल्या कमाईचे पैसे ज्यांनी या वर्षांकासाठी दिले ते आमचे जाहिरातदार आमचे हक्काचे आधारवड आहेत त्यांच्या या लोभाबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.

प्रा. चंद्रहास धुमाळ यांचा कुंचला याही वर्षी शिवराजवरून फिरला आहे. त्यांचे सुबक मुद्रण सुरेख मांडणी व वक्तशीरपणा ही वैशिष्ट्ये याही वर्षी त्यांनी दाखविली.

कोल्हापूरच्या श्री प्रोसेसचे ब्लॉक्स नेहमीप्रमाणे उत्तम.

शिवराजच्या नवोदित कलाकारांच्या भाव गंधाने बहरलेली ही अक्षरवेल आपल्याला सादर करताना माझे मन भरून आले आहे. या अनघड, ग्रामीण प्रतिभेवर जरी 'पॉलिशड्' संस्कार नसले तरी तिचा गंध बकुळीचा आहे तो सतत आपल्या अंतरी रेंगाळत राहो एवढीच अपेक्षा.



संपादक

**प्रा. गजानन जी. गुळवणी**

# 'हृद्गत'

यावर्षीचे शैक्षणिक वर्ष सुरू झाले नि आभाळ अगदी काळ्या कुट्ट ढगांनी भरुन आले. हे वर्ष आले तेच मुळी महापूर घेऊन. आभाळ कसे अगदी फटल्या सारखे वाटले. थेंबा-थेंबानी येणारा नेहमीचा तो पावसाळा नव्हता तर उन्हाळ्याच्या झळाच ओतणारा हा पावसाळा होता. गेल्या चाळीस वर्षात नव्हता एवढा उच्छाद पावसाने मांडला. निसर्गचक्र बिघडल्या-सारखे वाटले. चक्रीवादळाने एकच हल्लकल्लोळ उडवून दिला. नि ढगांच्या मोटा आजरा-गडहिंग्लज भागात सातत्याने सांडू लागल्या. सगळेच विपरित घडू लागले. नदीच्या पात्रात या हट्टी पावसाचे पाणी कांही केल्या मावेनासे झाले. पुराच्या पाण्याने आपली मर्यादा सोडली. नदीने माया-ममतेचे किनारे सोडले. सगळीकडे त्याने रणकंदन सुरू केले. बघता-बघता त्याने कडेच्या वाड्यावस्त्या पार बुडवून टाकल्या. कुडाच्या झोपड्या वाहून गेल्या नि मातीची घरे पार मातीमोल झाली. हजारो लोक बेघर झाले. कित्येकांची शेती गंगेला मिळाली. त्याचा परिणाम महाविद्यालयीन जीवनावरही झाला. जलप्रपाताबरोबर, जनलोकात जणू अश्रुपात झाला. प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी या संकटकाळी धाऊन गेले. आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजने मार्फत हजारो रुपयांची मदत गोळा केली व पुरग्रस्तांसाठी दिली. विशेष म्हणजे आमच्या संस्थेचे मा. अध्यक्ष खा. बाळासाहेब माने यानी हुपरी येथील तरूण मंडळाला आवाहन करून गडहिंग्लज पुरग्रस्तांना मदत दिली व स्वतः येऊन ती वाटली.



अंगावरचे पावसाच्या मान्याचे ओले वळ वाळ-वीत आम्ही महाविद्यालयीन कामकाज सुरू केले. विज्ञान विभागाचा बी. एस्सी. भाग २ चा वर्ग यावर्षी आम्ही मोठ्या जोमाने सुरू केला. अडी-अडचणींची तमा न बाळगता गडहिंग्लज आजरा, चंदगड या तीन तालुक्यांतील विद्यार्थ्यांची वैज्ञानिक अत्यावश्यक गरज भागविण्यासाठी आमच्या संस्थेने विज्ञान विभाग मोठ्या जिद्दीने सुरू केला. यासाठी प्रयोगशाळा महाविद्यालयाच्या परिसरातच सर्वांगाने परिपूर्ण व्हाव्यात म्हणून आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा. खा. मानेसाहेब यांनी आम्हाला आदेश दिला नि सर्व शक्तिनिशी आम्ही सर्वजण कामाला लागलो. अनंत अडचणींना तोंड देऊन आम्ही ताबडतोब आमच्या

प्रयोगशाळा सुसज्ज केल्या, विज्ञान विभाग खऱ्या अर्थाने मार्गी लागला. समृद्ध ग्रंथालयाबरोबरच संपन्न प्रयोगशाळांचे दागिने शिवराज सरस्वतीने आपल्या गळ्यात घातले.

महापुराने बावरलेली मने कशीतरी सावरली होती. भरगच्च वर्ग भरू लागले. खेळांसाठी क्रीडांगण फुलू-उमलू लागले. पण तेवढ्यात तडितेचा आघात झाला नि ती कोसळली ती आमच्या महाविद्यालयाचे प्राध्यापक दुंडगेकर यांच्या घरावर ! ब्लड कॅनसरने प्रा दुंडगेकर निवर्तले. आमचे महाविद्यालय एका कर्त्या, स्वयंशिस्तिच्या समाजप्रेमी व विद्यार्थीप्रिय प्राध्यापकास मुकले. ताम्रपर्णीचे पाणीही काळेभोर झाले.

आमच्या महाविद्यालयाने यावर्षीही क्रीडाक्षेत्रात पराक्रमाची शर्थ केली नि गतवर्षीप्रमाणे यावर्षीही कोल्हापूर जिल्हयाचे विभागीय सर्वसाधारण विजेतेपद जिकून आणले पण शिवराजच्या यशस्वीतेचे डंके वेदनेच्या सुरांनी गोठवून टाकले. कांही प्राध्यापक, कर्मचारी यांच्याही घरी दुःखद प्रसंग यावर्षी घडले व आम्ही व्यथित झालो.

दुसऱ्या सत्रात महाविद्यालयीन कामकाज प्रारंभापासूनच शिस्तबद्ध रीतीने सुरू झाले. वर्ग, ग्रंथालय नि प्रयोगशाळा सरस्वतीच्या वीणा झंकाराने झंकारीत होऊ लागल्या. कामा-धामांच्या व्यग्रतेत थोडे दिवस जातात न जातात तो पुनच्च प्रचंड दैवी आघात झाला. ज्यांनी विज्ञान शाखेसाठी प्रज्ञावंत प्रेरणा प्रदान केली व लक्ष्मीचा वरदहस्त शिवराजच्या माथ्यावर धरला. अशा आमच्या मा. अध्यक्ष खा. मानेसाहेब यांच्या मातुश्री, वात्सल्यमुर्ती, श्रीमती सरस्वतीदेवी यांचे व ग. को चे उपाध्यक्ष मा. डी. एस. कदम यांच्या मातुश्रींचे निधन झाले. शिवराज सरस्वतीच्या वीणेतील जणू दोन ताराच तुटून पडल्या. मातेची ममता देणाऱ्या वात्सल्य गंगेचे दोन प्रवाहच अचानकपणे अटून गेले. आमच्या संस्थेच्या जिव्हाळ्याच्या दोन व्यक्तिच्या घरी अवस दाटली. आमची मनेही दुःखाने केवळ सुन्न होऊन गेली. आमच्या संस्थेचे सचिव प्रा. भैरव कुंभार यांच्या वडिलांचेही निधन झाले. शिवराजचे माजी प्राचार्य बी. व्ही. पोतदार हेही निवर्तले. संकटे कधी एकटी येत नाहीत याची प्रचिती आम्हास पटली. दुःखाची ओझी वहातच आम्ही मार्गक्रमण सुरू ठेवला. जडावल्या पावलांनी आम्ही चालत राहिलो. तुटल्या तारांच्या जखमा आम्ही मस्तकावर झेलीत चालत राहिलो पण एक दिवस असह्य उल्कापात झाला. आकाश कोसळावे किंवा धरती दुभंगावी त्याप्रमाणे परम दारूण दुःख देणारी दुर्वार्ता आमच्या कानावर कोसळली. "मनसा चिंतितं कार्यम् । दैव अन्यत्र चिंतयेत्" असे घडले. आमचे मा. अध्यक्ष खा. बाळासाहेब माने यांच्या एकुलत्या एका मुलाला भयानक ॲक्सिडेंट झाला होता. मुंबईत निष्णात डॉक्टरांनी प्रयत्नांची शर्थ केली पण सर्व कांही निष्फळ ठरले. आमचे प्रिय लाडके संभाजीराव आमच्यातून निघून गेले. निरागस, सतत हसतमुख निष्पाप, प्रसन्नचित्त संभाजीरावांना परमेश्वर आमच्या आनंद मेळ्यातून घेऊन गेला. खा. माने कुटुंबियांच्या घरचे अमोलिक रत्न बघता-बघता अंतर्धान पावले. खा. बाळासाहेबांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखाला तर पारावार उरला नाही. स्वतः साहेब म्हणजे धैर्य सुमुद्र पण दुर्दैवाने धैर्य समुद्र ढवळला. साहेबांना फार मोठ दुःख ठेऊन संभाजीराव गेले. आशेचा सूर्य मावळला, आनंदाचा चंद्र निमाला. आम्ही सर्वजण अतीव शोकाकुल झालो. परमेश्वरानेच या असह्य दुःखातून साहेबांना आशेचा किरण दाखवावा. दुर्दम्य दुःख सहन करण्याची शक्ती द्यावी. अशी प्रार्थना करणेच केवळ आज आमच्या हाती उरले.

यावर्षी विज्ञान शाखेला ग. को. चे. उपाध्यक्ष मा. डी. एस. कदम यांनी दोन लाख रुपयांची उदार देणगी दिली. आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा खा. बाळासाहेब यांनी प्रयत्नांची शिकस्त करून, दिल्ली दरबारी आपले वजन खर्च करून विद्यापीठ अनुदान मंडळाकडून सहा लाख रुपयांचे अनुदान 'शिवराज'ला मंजूर करून आणले व 'शिवराज'च्या इतिहासात सोनेरी पान लिहिले. आता 'शिवराज'ची प्रसादतुल्य इमारत उभी राहील. त्यामुळे इमारतीच्या संदर्भातील आमच्या बहुतांशी गरजा पूर्ण होतील. 'शिवराज'ला राजवैभव प्राप्त व्हावे म्हणून मा. मानेसाहेबांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली आहे व करीत आहेत. पण त्यांच्या पुत्र रत्नाला वैभवाच्या राज्यावरून परमेश्वराने अचानक नेले त्याचे शल्य मनी-मानसी खोलवर जाऊन राहिले आहे.

यावर्षी आमच्या महाविद्यालयात 'राज्यशास्त्र' हा आणखी एक नवीन विषय बी. ए भाग ३ साठी आम्ही सुरू केला. तसेच मराठी, हिंदी या विषया-बरोबरच अर्थशास्त्र-समाजशास्त्र हे नवीन विषय एम. ए. पातळीवर सुरू केले. आणखी एक स्पृहणीय बाब म्हणजे आमच्या महाविद्यालयातील प्रा. एस. टी. जाधव हे जेष्ठ प्राध्यापक लीनवर भोगावती महा-विद्यालयात प्राचार्य म्हणून गेले प्रा. जोडगुद्री यांनी एन. सी. सी. प्रशिक्षणात राज्यात प्रथम क्रमांक मिळवून विशेष उल्लेखनीय प्राविण्य पारितोषिक मिळविले. श्री. गोरूले पी. व्ही. या १२ कॉमर्समधील विद्यार्थ्याने धावण्याच्या शर्यतीत राज्यपातळीवर सुवर्णपदक जिंकून आणले.

पुनः पुन्हा झालेल्या दैवी अ घातांनी मन गंभीर झाले असतांना संस्थेचे पदाधिकारी, मान्यवर सदस्य, प्राध्यापक व कर्मचारी मित्र, विद्यार्थी-विद्यार्थींनी यांनी मोलाचे सहकार्य केले, जिव्हाळा दाखविला म्हणूनच अध्यापन, क्रीडा, स्नेहसमेलन, अंतर्गत मूल्य-मापन हे कार्यक्रम आम्हाला वेळेत पार पाडता आले. या संदर्भात जी. एस सुरेश पेडणेकर, यु. आर. विक्रांत गुरव, ज्युनि. जी एम. नदाफ व सर्व वर्ग प्रतिनिधी विद्यार्थी-विद्यार्थींनी यानी आमच्या वेळोवेळीच्या सुखदुःखात सहभावना व सहवेदना दाखविली. यामुळे 'शिवराज' वरील निकोप प्रेमाची आम्हाला प्रचीती आली या सर्वांचा उल्लेख करणे मी माझे कर्तव्य समजतो

फुलत्या निखाऱ्यावरून चालत रहावे. त्याप्रमाणे यावर्षी महाविद्यालयाचे मार्गक्रमण कर्तव्यबुद्धीने आम्ही करीत राहिलो पण आम्ही उरी फुटत गेलो, दुखरेमन सांभाळीत गेलो एवढे मात्र खरे.

**– प्राचार्य बलवंत देशमुख**

# श्र द्धां ज ली



प्रा. नामदेवराव दुंडगेकर



श्री. संभाजीराव माने

" इथे सुरू होण्याआधी संपते कहाणी

साक्षीला उरते केवळ डोळ्यांतील पाणी "

# श्र द्धां ज ली

या वर्षी शिवराजच्या परिवाराला आपल्या प्रिय व्यक्तिच्या चिरवियोगाचे आघात सतत सहन करावे लागले. Death being childless steals our children (मृत्यू वांझ असल्यामुळे आपली पिले चोरुन नेतो) याची प्रचिती अशा वेळी येते.

अध्यापन, समाजसेवा, अभिनय, क्रीडा, समीक्षा, संगीत राजकारण या विविध अंगांनी तुमचे आमचे जीवन समृद्ध करणाऱ्या या महनीय व्यक्ती आपल्या आयुष्याची मैफिल अर्ध्यावरच सोडून गेल्या त्यांचे आम्ही कृतज्ञतापूर्वक स्मरण करतो.

- लोकनेते – श्री बाळासाहेब देसाई
- कोल्हापूर संस्थानचे अधिपती – श्रीमंत छत्रपती शहाजी महाराज
- हलकर्णीचे प्रगतीशील शेतकरी – श्री कंगुरीअण्णा
- शिवराजचे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक – नामदेवराव डुंडगेकर
- स्वरयोगी गायक – वसंतराव देशपांडे
- कदमअण्णा यांच्या मातोश्री – श्रीमती ताई कदम
- खा. बाळासाहेब माने यांच्या मातोश्री – श्रीमती सरस्वतीबाई माने
- सचिव प्रा. कुंभार यांचे वडील – श्री गुंडोपंत कुंभार
- खा. बाळासाहेब माने यांचे सुपुत्र महाराष्ट्र शेती महामंडळाचे संचालक – श्री संभाजीराव माने
- विख्यात अभिनेते – सोहराब मोदी
- अष्टपैलू फलंदाज – विजय मांजरेकर
- माजी केंद्रीय मंत्री – सी. एम. स्टीफन
- महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष – मा. राजाराम बापू पाटील
- माजी आमदार व सत्यशोधक – डी. एस. नार्वेकर, गुरुजी
- ज्येष्ठ पत्रकार व सौंदर्यवादी समीक्षक – प्रभाकर पाध्ये
- नटसम्राट – दत्ता भट
- सेवादलाचे – भाऊसाहेब रानडे
- साहित्यिक, आमदार – सौ. कुसूम अभ्यंकर

या सर्वांना शिवराज परिवाराची भावपूर्ण श्रद्धांजली.

# १९८३-८४ वर्षातील विशेष नोंदी

१) विज्ञान शाखेच्या भौतिक, रसायन व जीवशास्त्र प्रयोगशाळा स्वतःच्या वास्तूत सुरू झाल्या.

२) आपल्या महाविद्यालयातील कर्मचारी श्री डी. एम. मोरे, बी. कॉम. उत्तीर्ण झाले.

३) ग्रामीण भागातील रेमेडियल कोर्सेससाठी १००% अनुदान यु. जी. सी. ने मंजूर केले. हे अनुदान मिळविणारे शिवराज हे शिवाजी विद्यापीठातील पहिले ग्रामीण महाविद्यालय आहे. (अनुदान रू. ६०,०००/-)

४) ज्येष्ठ प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख एस. टी. जाधव यांची विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळावर निवड व भोगावती महाविद्यालय, कुरूकलीच्या प्राचार्यपदी नियुक्ती.

५) प्रा. सौ. एस. वाय. कोले, अर्थशास्त्र विषयात एम. फील.

६) विद्यापीठ अनुदान मंडळाच्या योजना योग्य प्रकारे तयार करणे हे जितके जिकीरीचे त्याहीपेक्षा त्या योजना विद्यापीठ अनुदान मंडळाला पाठवून देणे, ग्रामीण भागास या योजनांची कां गरज आहे ते समजावून देणे हे खडतर व वेळ जाणारे काम आमचे धडाडीचे अध्यक्ष खासदार बाळासाहेब माने यांनी परिश्रमपूर्वक केले त्यामुळे विविध योजना आज आकार घेत आहेत.

७) फॉकल्टी इंप्रुव्हमेंटच्या कार्यवाहीसाठी प्रा. कुराडे व प्रा. म्हेत्तर यांची एम. फील साठी निवड.

८) बेसिक असिस्टन्स म्हणून बुक बँक, पुस्तके व नियतकालिके यासाठी यु.जी.सी.ने रु. ३७,५००/- चे व विज्ञान साहित्य खरेदीसाठी रु. १२,४५० चे अनुदान मंजूर केले. त्याचबरोबर शिवराजच्या प्राध्यापकांना अन्य विद्यापीठातील परिषदांना उपस्थित राहण्यासाठी रु ४८००/-चे अनुदान मंजूर केले.

विकास अनुदान – १) पुस्तके व जर्नलस्साठी रू. १,०१,२५०/-
२) प्रयोगशाळा, साहित्य व फर्निचर रू. ९०,०००
३) वाढीव इमारत व विस्तारीकरण रू १,१५,०००/-

या स्कीममध्ये यु.जी.सी.चे शिक्षणाधिकारी श्री. एम. सरकार, अध्यक्षा श्रीमती माधुरीबेन शाह, माजी कुलगुरु प्राचार्य कणबरकर, विद्यमान कुलगुरू प्राचार्य भोगिशयन, माजी प्रभारी कुलसचिव श्री. कडीयाल, सध्याचे कुलसचिव श्री. हणमंतराव पाटणकर, श्री. औताडे व श्री. बने यांचे सहकार्य लाभले.

९) अर्थशास्त्र व समाजशास्त्राचे एम. ए. चे वर्ग सुरू झाले.

१०) प्रा. विठ्ठल बन्ने- देवदासी मुक्ती चळवळीचे प्रणेते, त्यांच्या या कार्याची नोंद 'Eves Weekly' या इंग्रजी पाक्षिकाने घेतली आहे.

११) ग्रंथपाल श्री. टी. ए. पाटील, यांची जळगांवच्या ग्रंथालय अधिवेशनास उपस्थिती. तेथे महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या अडचणी या विषयांवर त्यांनी विचार व्यक्त केले.

१२) प्रा. कुराडे व प्रा. पवार यांनी 'शेतकरी भविष्य निर्वाह निधी' ही अभिनव कल्पना पुढे आणली. 'शेतकी क्रांतीच्या दिशा' या ग्रंथाची निर्मिती केली.

१३) डॉ गोकाककर (शोध निदेशक) : सौ. शीला देशमुख पी.एच डी. झाल्या व सुरेश अष्टपुत्र यांचा प्रबंध विद्यापीठास सादर केला. तसेच 'प्रायोगिक हिंदी व्याकरण' हे त्यांनी व डॉ. गो. रा कुलकर्णी यांनी लिहिलेल्या पुस्तकाचा कर्नाटक विद्यापीठात पाठ्यपुस्तक म्हणून स्वीकार.

१४) प्रा. खिचडी व प्रा. सविता जोशी शिवराजच्या स्नेहसंमेलनासाठी बसविलेल्या 'घालीन लोटांगण' या नाटकाचे यशस्वी दिग्दर्शन व भोगावती महाविद्यालय कुरूकली येथे सदिच्छा प्रयोग व माणगांव हायस्कूल (जि. सिंधुदुर्ग)च्या मदतीसाठी प्रयोग सादर केला.

१५) प्रा. सविता जोशी यांनी लिहिलेल्या स्त्री विषयक निबंध लेखांना नियतकालीकातून प्रसिद्धी.

१६) महाविद्यालयातील कार्यालयीन कर्मचारी कु. पी. जी. चोथे व श्री. बी. एस. सावंत यांचा विवाह एप्रिल ८३ मध्ये पार पडला. या आमच्या विवाहाचे सर्व थरांतून स्वागत झाले.

१७) महाविद्यालयास यावर्षी कवी डॉ. वसंत सावंत, सुप्रसिद्ध अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर, दै. गोमांतकचे संपादक अनिरूद्ध पुनर्वसू व श्रीकांत कासकर यांनी भेट दिली. आतापर्यंत मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत शिवराजमध्ये येऊन गेले आहेत. शिवाजी विद्यापीठात साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक चळवळीत शिवराज हे एकमेव महाविद्यालय आघाडीवर आहे.

१८) श्री. भाई वैद्य यांनीही भेट देऊन मंडळ आयोगाची पार्श्वभूमी विशद केली. तर प्रा. मधू किश्वर यांनी स्त्री मुक्ती बद्धल विचार मांडले.

१९) विद्यार्थी प्रतिनिधींच्या सत्कारासाठी चेअरमन मा आप्पासाहेब नलवडे उपस्थित होते.

२०) विज्ञान शाखेला आमचे उपाध्यक्ष मा. डी. एस. कदम यांनी दोन लाख रुपयांची देणगी दिली. यांच्या या दातृत्वाचा गडहिंग्लजकरांनी सन्मान केला.

२१) प्रा. सुभाष कोतमिरे हे एक तरुण वनस्पती शास्त्रज्ञ यांच्या यशाबद्दल शिवराजला अभिमान वाटतो

१) या वर्षी गोव्यात भरलेल्या "ऑल इंडिया सिंपोझियम ऑन मरीन प्लॅन्टस्" मध्ये आपला शोधनिबंध सादर केला.

२) भुवनेश्वर येथे भरलेल्या सहाव्या अखिल भारतीय वनस्पती शास्त्रज्ञ परिषदेत त्यांनी संशोधनपर लेख सादर केला.

३) रांची येथे भरलेल्या ७१ व्या भारतीय शास्त्रज्ञ अधिवेशनात आपल्या संशोधनपर लेखाचे वाचन केले.

४) वाल्टेअर येथे भरलेल्या चवथ्या परिषदेत संशोधनपर निबंधाचे वाचन केले. या शिवाय त्यांनी विविध विषयावर १२ संशोधनपर लेख लिहिले. १० राष्ट्रीय अधिवेशनास ते उपस्थित होते.

५) विद्यापीठ अनुदान मंडळाने "एरिओ बायालॉजीकल स्टडीज ऑफ गडहिंग्लज" या संशोधनासाठी त्यांना ६००० रु. मंजूर.

६) शिवाजी विद्यापीठाकडून "स्टडी ऑफ फ्लोरा अराऊंड गडहिंग्लज" या संशोधनासाठी १००० रु. चे अनुदान मंजूर केले.

७) शिवाजी विद्यापीठाकडे पी. एच. डी. साठी आपला प्रबंध त्यांनी सादर केला आहे.

● ●

शिवराजला हार्दिक शुभेच्छा !

पॅन्टस् स्पेशालिस्ट



'आर. के. टेलर्स'

गडहिंग्लज.

*R. K. Tailors*
Gadhinglaj.

एकवेळ आवश्य भेट द्या !


# Form No. IV (Rule No. 3)

| | |
|---|---|
| Place of Publication | - Shivraj College, Gadhinglaj. |
| Periodicity of Publication | - Annual. |
| Printers Name | - Zunjar Printing Press, Nipani. |
| Nationality | - Indian. |
| Address | - Zunjar P. Press, Tanaji Chowk, Nipani. |
| Publishers Name | - Prin. B. B. Deshmukh |
| Nationality | - Indian. |
| Editor's Name | - Prof. G. G. Gulavani |
| Nationality | - Indian. |
| Address | - Shivraj College, Gadhinglaj. |

I, Prin. B. B. Deshmukh, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and bellif.

Date-
10-4-84

B. B. DESHMUKH.
Signature of Publisher

# " आमचा प्राध्यापक वर्ग "

- **मराठी :**
  प्राचार्य बी. बी. देशमुख, प्रा. व्ही. एस. बन्ने,
  प्रा. सौ. एम. एन. कोटीभास्कर, प्रा. व्ही. एम. सुरंगे

- **हिंदी :**
  प्रा. डॉ. एस. जी. गोकाककर, प्रा. सौ. एस. एम. जगताप,
  प्रा. पी. व्ही. ताकभाते.

- **इंग्रजी :**
  प्रा. एन. आर. दुंडगेकर (ता. २-९-८३ पर्यंत), प्रा. के. बी केसरकर,
  प्रा. जी. जी. गुळवणी, प्रा. सौ. एस. ए. मुजूमदार, प्रा. एम व्ही. रॉड्रीक्स

- **अर्थशास्त्र :**
  प्रा. एस. टी. जाधव (लेन्ट हॅन्ड म्हणून भोगावती महाविद्यालय कुरूकली येथे प्राचार्य), प्रा. ए. ए. पोवार, प्रा. के. जी. माळी, प्रा डी. आर खटके.
  प्रा. सौ. एस. वाय. कोले.

- **समाजशास्त्र :**
  प्रा. व्ही. एन. गजेंद्रगड, प्रा. के. व्ही. कुराडे, प्रा. कु. एस. एस. जोशी,
  प्रा. एम. एस. चिकोडे.

- **राज्यशास्त्र :**
  प्रा. डी व्ही. पाटील, प्रा. सी. ई धुमाळ.

- **मानसशास्त्र-तर्कशास्त्र :**
  प्रा. बी. के. सोरटे, प्रा. व्ही. बी. सकटे

- **वाणिज्य :**
  प्रा. सी. एस. गवसणे, प्रा. एन. डी. खिचडी, प्रा. आर. बी. तेळी,
  प्रा. व्ही. के. पाटील, प्रा. आर. एन. हरगुडे, प्रा. एम व्ही आपटे,
  प्रा. वाय. पी. कोले, प्रा. एस. बी. कडूकर.

- **शारिरिक शिक्षण :**
  प्रा. ए. एस. नाळे, प्रा. एस. एस. सावंत.

- **रसायनशास्त्र :**
  प्रा. टी. एन. पाटील, प्रा. डॉ. पी. जी. मोरे

- **पदार्थ विज्ञानशास्त्र :**
  प्रा. एस. ए. जोडगुद्री, प्रा. बी. डी. मुरगी.

- **वनस्पतीशास्त्र :**
  प्रा. एस. बाय. कोतमिरे, प्रा. पी. टी. कट्टी.

- **प्राणीशास्त्र :**
  प्रा कु. एम. डी. कोकाटे, प्रा. आर. एन. कणसे.

- **संख्याशास्त्र :**
  प्रा. डी. एम. म्हेतर, प्रा. ए. बी. खोत.

- **गणित :**
  प्रा. डी. जी. वाठारे

- **शिक्षकेतर कर्मचारी विभाग :**
  श्री. जे. ए. सबनीस, कार्यालय अधिक्षक, श्री. टी. ए. पाटील, ग्रंथपाल, श्री. बी. एस. मोहिते, अकौंटंट, श्री. व्ही. एम. गवळी, सिनियर क्लार्क, सौ पी. बी. सावंत, क्लार्क, श्री एल. जो. गाडीवड्ड, क्लार्क, श्री. बी. डी. रेगडे, ग्रंथालय क्लार्क, श्री. वाय डी. पाटील, ग्रंथालय क्लार्क श्री. टी. जी. दुधाळे, लॅब. असिस्टंट, श्री. एस. एस. भोसले, लॅब. असिस्टंट, श्री. बी. आय. रामपूरे, हेड प्यून, श्री पी. के. जाधव, शिपाई, श्री. एस. एस. गवळी, शिपाई, श्री बी. एस. सावंत, लॅब. अटेंडंट, श्री. डी. एम. मोरे. शिपाई, श्री. सी एल. गोरूले, शिपाई, श्री. पी. जी. पवार, लॅब. अटेंडंट, श्री बी डी. मोरे, लॅब. अटेंडंट, श्री. ए. जी. कदम, लायब्ररी अटेंडंट, श्री. एम. एच. देसाई, लायब्ररी अटेंडंट, श्री. एस. बी. मुसळे, शिपाई, श्री. एस. बी. खोत, वॉचमन.

# विद्यार्थी - प्रतिनिधी



सुरेश पेडणेकर
जी. एस.



विक्रांत गुरव
यू. आर.



ईलाही नदाफ
ज्यु. जी. एस्.



कु. सुमित्रा ऐनापुरे
एल्. आर्.



कु. राजनंदा साळोखे
एल्. आर.



कु. उज्ज्वला देशपांडे
ज्यु. एल्. आर.

# वर्ग - प्रतिनिधी



पाटील डी. एम्.
एम्. ए. भाग १



पाटील एम्. ए.
बी. ए. भाग ३



कोकितकर बी. एस्.
बी. कॉम्. भाग २



निर्मळकर सी. बी.
बी. ए. भाग २



शिऊडकर एस्. व्ही.
बी. कॉम्. भाग १ ब



खोत ए. जी.
बी. ए. भाग २



दुधाळे अशोक
बी. एस्सी. भाग १



पेडणेकर व्ही. आय्.
बी. ए. भाग १



चौगले एन्. आर.
बी. कॉम्. भाग ३



पेंढारी आश्रफ
बी. एस्सी. भाग २



पाटील आर्. जी.
बी. कॉम्. भाग १ अ



माने पी. एस्.
१२ वी साहित्य



सतीश कुलकर्णी
१२ वी वाणिज्य



नाईक अरुण
१२ वी वाणिज्य



पाटील पी. आर.
१२ वी साहित्य



कोपार्डे अरुण
११ वी साहित्य



## स्नेह-संमेलन / क्षणचित्रे

• शेला-पागोटे



## वार्षिक क्रीडा स्पर्धा उद्घाटन





**श्री. विक्रांत गुरव ( यु. आर.) – फुटबॉलमध्ये**

१) शिवाजी विद्यापिठातर्फे जबलपूर येथे निवड.

२) कोल्हापूर जिल्हा असोसिएशनतर्फे मुंबई येथे निवड.

## वार्षिक क्रीडा स्पर्धा

कबड्डी : एक प्रेक्षणीय सामना






← पारितोषिक वितरण
↓

जनरल चॅम्पियनशिप स्विकारताना – कु. घेवडे

जनरल चॅम्पियनशिप स्विकारताना –
श्री. कानडे



# ' मराठी विभाग '



फोडीले भांडार । धन्याचा हा माल
मी तो हमाल । भारवाही

— तुकाराम

पण वेडाच्याभरात बेभान झाल्यामुळे हा गुन्हा तिच्याकडून घडला असावा असा मांडणेत आलेला युक्तिवादाचा मुद्दा ग्राह्य मानण्याइतपतचा परिस्थितीजन्य पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही.

या खटल्यातील आरोपीवर ठेवणेत आलेल्या आरोपांची योग्य ती चिकित्सा करणेत आली आहे. अनेक साक्षी पुराव्यावरून हे सिद्ध होते की, आरोपी राधाबाई भिमा मांगले ही सुशिक्षित माता असूनसुद्धा मातृत्वाला व माणुसकीला काळीमा फासून एका शाळकरी मुलाच्या मृत्यूस कारणीभूत झाली आहे. अशा कृत्यामुळे समाज जीवनात एक प्रकारचे भीतीचे वातावरण पसरून असुरक्षितता निर्माण होऊ नये, म्हणून आरोपीने केलेल्या गुन्हयाची गंभीर दखल घेऊन असा निकाल देण्यात येतो की, आरोपी श्रीमती राधाबाई भिमा मांगले ही एका शाळकरी मुलाच्या मृत्यस जबाबदार असल्याने इंडियन पिनल कोड ३०५ या कलमाखाली मरेपर्यंत फाशीची शिक्षा फर्माविण्यात येत आहे.

राधा – ( करूण आर्त संगीताचे सूर ) राधाचे विकट हास्य.. हुंदके.... यांनी वातावरण भरून जाते. काही क्षणातच डाव्या बाजूकडील पारदर्शक पडद्यामागील दृष्यात –

अेक झोपडी पेटली आहे. ज्वाला भडकल्या आहेत. राधाच्या नवऱ्याच्या "राधा... राधा... राधा..." असा हंबरडा व मुलाचा 'आई... आई...' अशा करूण किंकाळ्या... पेटवा... मारा... साल्यांने आम्हाला भिकेला लावायचा कट केलाय. जिवंत ठेऊ नका... हाणा मारा... असे ध्वनी उमटतात. राधा बेभान होते... किंचाळते .. तुरुंगातील दारे फोडण्यासाठी गजावर जोर जाराने हात डोके आपटते असहाय स्थितीत उन्मळून कोसळते तिच्या मनाची आग-आग होऊन तुरुंगातील फरशीवर आधार शोधू पहात आहे. आक्रोश वाढतच रहातो काही क्षणानतर हुंदके देत राधा गुडघ्यावर डोके टेकून बसते. एका शून्यात नजर स्थिर रोखून पहाते. काही क्षणाच्या भयाण स्मशान शांततेनंतर दूर कोठेतरी शाळेच्या घंटेचा ठण ऽ ठण ऽ ऽ ठण ऽ ऽ ऽ असा ध्वनी. मुलाचा गलका वाढतो काही वेळाने गलका कमी कमी होत जातो आणि त्यानंतर सामुदायिक प्रतिज्ञेचा ध्वनी ऐकू येऊ लागतो.

# ' एक हुंकार गजाआडचा '

एल. डी. कांबळे
(एम. ए. भाग १)

( स्थळ – स्टेजवरच्या उजव्या बाजूला कोपऱ्यात जेलमधील एक खोली. उजव्या बाजूलाच स्टूलावर एक पोलीस झोपलेल्या स्थितीत. मध्य भागात काही अंतराचा पडदा डाव्याबाजूला अर्ध्याभागात पारदर्शक पडदा. पडदा उघडल्यानंतर स्टेजवर पूर्ण अंधार असावा पडद्यामागे न्यायाधीश निकालपत्र वाचून दाखवीत आहेत. निकालपत्राचे वाचन जस–जसे संपत जाते, तस–तसा जेलमधील खोलीत असलेल्या आरोपी 'राधाबाई' वरील मंद प्रकाश तीव्र होतो )

न्यायाधीश – मौ. तुपे गावच्या एका शाळकरी मुलास आरोपी श्रीमती – राधाबाई भिमा मांगले हिने खेळण्याचे आमिष दाखवून तारीख ५-५-१९८२ रोजी दुपारी ३-०० वाजता शाळेच्या पाठीमागील जंगलात नेऊन झाडाला बांधून जिवंत जाळले आहे. या भयानक कृत्यानंतरही आरोपीने जवळच असलेल्या शाळा इमारतीवर पेटती मशाल फेकून देऊन शाळा इमारत पेटविण्याचा प्रयत्न केला असे आरोप ठेवण्यात आले आहेत. आरोपी सुशिक्षित तरूणी आहे

" भारत माझा देश आहे
सारे भारतीय माझे बांधव आहेत. "

राधा – (पिसाळून एकदम मोठ्याने आवाजाच्या दिशेने ओरडते ) बंद करा... बंद करा... (पडद्यामागील प्रतिज्ञेचा ध्वनी बंद होतो. त्यानंतर क्षणाभराने त्वेषात ) अरे – गिधाडांनो तुम्हाला तुमच्याच बांधवाच्या तोडलेल्या आतड्यातील रक्ताची धार का नाही दिसली... का..?

संस्कृती – बंद कर बडबड, नादानपणाच्या आवरणात गुरफटून वळवळणाऱ्या तुझ्यासारख्या स्त्रीला हिंदुस्थानातील उदात्त, उच्च संस्कृतीचा वारसा का नाही दिसत ?

राधा – ( तीव्र संतापाने ) कोण नादान ? मी...? मी.. नादान ? नादान आहे तुझा बाप. स्वतः शेण खाऊन परस्पर दुसऱ्यावर आळ घेणाऱ्याना घाणी शिवाय दुसरं काय दिसणार आहे ? फक्त घाण !

संस्कृती – ये, जीभ आवर नाही तर..?

राधा – काय करणार आहेस ? करून करून आणखी एका उध्वस्त जिवाचा बळी घेणार एवढंच. त्यासाठी तुझं रक्त उसळून बाहेर येतय संघटनेच्या शक्तिने पण... पण... लक्षात ठेव, माझ्या उदरी जन्माला आलेले सगळेच अंकुर नष्ट करण्याचे सामर्थ्य षंढ प्रकृतीत नाही आहे. माझ्या रक्तात एक तेजस्वी तारा उगवलाय, तो जाळून, तोडून, फोडून टाकील तुझी गांडूळ शिकवण

संस्कृती – अनेक तेजस्वी अंकुर केंव्हाच अंधारमय प्रवाहात विलीन करण्याची कला अवगत केलीय आमच्या संस्कृतीनं. पण, लक्षात ठेव, तुझ्या वेडापायी शाळकरी मुलाची हत्या केल्यानं तुला कोणीही क्षमा करणार नाही.. अगदी कोणीही.. ( डाव्या बाजूकडील पडद्यामागील दृश्य – फक्त ज्वाला भडकलेल्या दिसतात (मावशी... मावशी... मला मारू नका... नको...' शाळकरी मुलाच्या किंकाळ्यांचा आक्रोश एकू येतो. राधा भेदरलेली) ऐकलीस... त्या जीवाचा आकांत... तो तुला मरणाच्या दारातही भेडसावीत आहे...... भेडसावीत आहे.

राधा – ( चमकून ) क... कोण... कोण... आहेस ?

संस्कृती – ' हिंदुत्वासाठी ' जन्मापासून मरेपर्यंत माणसांच्या मनावर संस्कार करणारी एक किमया ! तुला काय वाटतय ?

राधा – (खिन्न हसून) विषवृक्षाची छाया !

संस्कृती – ( अत्यंत कडक जरबेने ) खबरदार एक शब्द पुढं बोलशील तर. मुलाची हत्या करणाऱ्या तुझ्यासारख्या निर्दयी, निष्ठूर स्त्रीला तुरूंगात मृत्युघंटा मोजायला पाठविणेच योग्य आहे.

राधा – हिम्मत असेल तर माझा संसार ज्या लांडग्यांनी धुळीला मिळविला, माझा गगन भेदून टाकणारा आक्रोश उघड्या डोळ्यानी पाहून सुद्धा ज्या बोकडांच्या अवलादीने माझी धिंड काढली, मला देशोधडीला लावून सगळे पुरावे नष्ट केले त्यांना पाठव तुरुगांत. आहे हिम्मत ? बोल... आहे हिम्मत ? माझी झोपडी पेटवून, माझ्या धन्याला व कोवळ्या जिवाला ज्यांनी कोंडून जाळले तेंव्हा तुझे तत्वज्ञान कुठे उकिरड्यावर शोधत बसली होतीस ? का नाही आली तुला कणव ? का नाही पाझर फुटला अंतःकरणात ? का...? का..?

संस्कृती – या नसत्या उठाठेवी करायचा अधिकार परमेश्वरानेच आम्हाला दिलेला नाही. जो करेल तो भरेल. ताकत असेल तर, जा, त्या व्यवस्थेलाच जाब विचार. आहे तयारी ?

राधा – मला तुरुंगवास मिळाल्याचा आनंद मानायचा अधिकार तुला कोणी दिलाय ? दुबळ्यांवर आघात करून त्यांना नेस्तनाबूत करायची अधिसत्ता तुला कोणी दिलीय ? कोणत्या व्यवस्थेने दिलाय ? ज्या कोणाला जाब विचारायचा तो केंव्हाच विचारून टाकलाय, आता फक्त त्या काळाची वाट पाहते आहे. अंधारी वाट आहे पण प्रकाशकिरण तेजाळून उठताहेत. उजाडेल, तोही एक दिवस उजाडेल त्यावेळी जळून जाशील आपोआप.

संस्कृती – विध्वंसाच्या दिशेची चाहूल काळी आहे हे त्या मुलाचे जळालेले प्रेत पाहून सुद्धा तो मार्ग

जवळचा वाटतो ? का ? अखेर... यातून काय साधणार आहेस ?

राधा – अन्याय, अत्याचाराच्या ढिगाऱ्याखाली चिरडून भरडून चेंदामेंदा झाले. माझ्या अस्तित्वाची चिता पेटविली तरीही मी काय करावं आणि काय करू नये याचा निर्णय मी का घेऊ नये ?

संस्कृती – तुझ्यावर अन्याय झाला तर प्रति अन्यायाने न्यायाची राखरांगोळी करण्याची अभिलाषा का ? कशासाठी ?

राधा – (एकदम संतप्त तीव्र स्वरात) काय म्हणालीस ? न्याय ? (विकट हास्य) कुठं आहे तो ? जखम उरात घेवून गेली कित्येक शतकं शोधतेय, पण एक सुद्धा रामशास्त्री भेटला नाही. अखेर... अखेर थकले. न्यायाचा दिवस उजाडेल म्हणून विठ्ठलाला हाक मारली. काय मिळालं ? न्याय मिळाला ? जाळून मारलेल्या माझ्या मुलाच्या व धन्याची किंकाळ्यांची आग अंतःकरणात एकसारखी भडकून त्याचा डोंब उसळला मी बेभान झाले. न्यायाचे बंदिस्त दरवाजे खाडखाड ठोठावले. पण कुणाला ऐकूच गेलं नाही. कुणीही नाही उघडला न्यायाचा दरवाजा. मग निर्धार केला न्याय आपणच मिळवायचा.

संस्कृती – कलंकित न्याय मिळवून तुला काय मिळालं ?

राधा – (वेदनेने) ज्यांनी माझ्या नवऱ्याला माझ्या बाळाला जाळून मला उध्वस्त केलं त्या नरपशुंना काय मिळालं ?

संस्कृती – श्रेष्ठ अधिसत्तेला पायदळी तुडविण्याचा डाव तुझ्या नवऱ्याने केला हा, त्याचा अपराध त्याच्या नाशास कारणीभूत आहे.

राधा – गरीब मजुरांची संघटना उभी करून त्यांची पिळवणूक थांबविण्यासाठी लढा केला हा आमचा अपराध होता ? दरिद्री माणसांनाही लज्जा रक्षणासाठी कपडा आणि पोटासाठी अन्न मिळायला पाहिजे यासाठी आग्रह धरला हा काय आमचा अपराध होता ? पिढ्यान् पिढ्या ज्या जमिनीत राबराबून आमचे रक्त आटले त्या जमिनीतील एक तुकडा पोटाची खळगी भरण्यासाठी मागितला हा जर अपराध असेल तर न्याय काय आहे ? आमच्या कित्येक पिढ्या भुकेकंगाल राहिल्या. दारिद्र्याचा अग्नि पचवून मेल्या तेंव्हा कुठे गेली होती संस्कृती आणि आताच का आलीस संस्कृतीच जीर्ण गाठोडं माझ्यासमोर...?

संस्कृती – संस्कृती श्रेष्ठत्वाची. अस्तित्वाची धुळधाण होऊ नये म्हणून परमेश्वरी संकेतान सैतानांचा मुडदा पाडून त्याच्या पापाला धडा शिकविण्यासाठी.

राधा – सैतान ? कोण आहे सैतान ? तू का मी ? कुणाचे पाप ? कुणाचे पुण्य ? कोण हिशोब करतोय ? तुझा... परमेश्वर ? आणि इतके दिवस कोठ गेला होता परमेश्वरी संकेत ? का नाही दिसली त्याला तुझ्या भाऊबंद सैतानांची नीच कृत्ये ? मला आडरानात विवस्त्र करून अब्रू लुटणारे ते हात का नाही दृष्टीस पडले तुझ्या परमेश्वराच्या ? तिसरा डोळा उघडून का नाही जाळून टाकलीत त्या नराधमांची प्रेतं ? का ऽ का ऽऽ ? (क्षणभर स्तब्धता) ज्यांना धडा शिकवायला पाहिजे त्या जनावरांना अन्याय अत्याचाराचे थैमान घालण्याचा परवाना देणारी तूच का ती संस्कृती ? ही संस्कृती फक्त गरीबानाच न्यायाचे, नीति अनीतिचे धडे शिकवते आणि अन्याय करून न्याय निवाड्यांचे सोंग ढोंग करते म्हणूनच तुझ्यासारखी स्वप्नाळू पिलावळ संस्कृतीच्या आवरणाखाली सत्याचा आभास निर्माण करून असत्याची बीज रूजविते या देशात ज्यांनी हे आभास ओळखले, नाकारले त्यांना या मातीत काय शिक्षा मिळालीय आहे ठाऊक ? फक्त मरणप्राय वेदना पण या वेदनेतूनच कधी काळी एक ठिणगी पेट घेऊन तुमच्या अस्तित्वालाच उध्वळून लावील याची खंत इथल्या सस्कृती महात्म्यांना कधी लागलीच नाही आणि लागणारही नाही.

संस्कृती – पेटलेली ठिणगी क्षणात विझवायचे शास्त्र सामर्थ्य अवगत आहे की नाही. याच साक्षात प्रत्यंतर आणून द्यायलाच पाहिजे तुला त्याशिवाय तुझी पोपटपंची थांबायची नाही.

राधा – माणसांच्या अंतःकरणात तेजाने पेट– लेल्या सगळयाच ठिणग्या विझविणं. हे पेटविलेली विडी विझविण्या इतकं सोपं नाही आहे ? जे शास्त्र तू निर्माण केलं आहेस ते केंव्हाच जाळून टाकलय माझ्या भीमरावानं आणि सांगितलय "गुलामांना गुलाम– गिरीची जाणीव करून द्या म्हणजे ते बंड करून उठतील (भावनावेगाने जणू स्वतःशीच) माझ्या राजा तुझ्यासारखा गरीबांचा कैवारी अडीच हजार वर्षांनी जन्माला आला मेलेली मनं पेटली, धगधगत्या लाव्हारसाने भरलेल्या, समता, स्वातंत्र्य विश्वबंधु– त्वाच्या क्रांतीच्या विचारांच्या, लाटाच लाटा तळापर्यंत जाऊन भिडल्या आणि साऱ्या जगाचे डोळे दिपून गेले परंतु तुझ्यासारख्या क्रांतीसूर्याचे तेज पाठ फिरवून, डोळे झाकून मोजणाऱ्या इथल्या मातीने आम्हाला पाणी मिळू दिलं नाही. धर्मांतर करू दिलं नाही. नामांतर करू दिलं नाही. नोकरीत लायकी गुणवत्तेचा प्रश्न नालायकीपणानं निर्माण केला. राजकारणात गोळया झाडण्यासाठी शिखंडीसारखा वापर केला. देव आमचाही आहे त्यावर हक्क सांगितला तर देवालाही विटाळ झाला. जमिन पाणी मागितले तर खुनांच्या राशी पडल्या. संघटना करून चळवळी केल्या पण त्यातही सुरुंग पेरुन ठेवले. पाय टाकताच तेथे स्फोट होऊन विध्वंस झाला. स्वतंत्र मतदार संघ मागितला तर देशद्रोही म्हणून अवहेलना केली. न्यायालयात गेले तर तिथही साक्षी पुरावे मिळाले नाहीत. भीम– राजा, तूच केलेल्या कायद्यात कायदा माणसासाठी आहे. कोणाची श्रेष्ठत्वाची सत्तेची मक्तेदारी टिक– विण्यासाठी नाही. हे त्यांना का कळू नये ? या मातीत माणूसच माणसांचा गुलाम राहिला पाहिजे ही संस्कृती समजली जाते. ही संस्कृती की, विकृती याच शोध घेत राहिले पण त्याच्या आधीच माझ्यावर सूड उगवला गेला आणि मी दुबळी एकाकी झाले.

संस्कृती – एक अस्पृश्य स्त्री म्हणून तुझ्या दुःखाचा आक्रोश तू चालविला आहेस. पण जगात अनेक स्त्रीयांवर अंतःकरण पिळवटून टाकणारे प्रसंग ओढविले आहेत ते अन्यायी नाहीत ? त्यांनी मनांतील सूडाचा राक्षस का नाही जागा केला ? का नाही कावळया जिवांची हत्या केली ?

राधा – याचे हिशोब संस्कृतीच्या गाठोड्यात घट्ट बांधून ठेवलेत जरा डोळे उघडून पहा म्हणजे दिसेल धर्माचे काळे कर्तृत्व की, जे पुरुष श्रेष्ठत्वाच्या वर्तुळात दडून गेले आहे. त्यांच्यावर अन्याय झाला, बलात्कार झाला, तर न्यायासाठी रामशास्त्री भेटेल, वर्तुळ परीघावरील सर्व पाठीराखे मोर्चे काढतील, निषेध सभा घेतील, संसदेत न्यायासाठी हाक घालतील पण अस्पृश्य स्त्रीची विटंबना झाली तरी ज्यांना ती कवडी मोलाची वाटते ते नपुसंक नुसता कांगावा करतील, प्रचार करतील, त्यावर राजकारण करतील पण न्याय देण्यासाठी प्रथम आपले वर्तुळ पाहतील.

संस्कृती – मग तुझ्या वर्तुळातील भाईनी का नाही न्याय मिळवून दिला ? त्यांना न्यायरेषेची चाड का असू नये ?

राधा – दुबळयांच्यावर स्वार होणारी षड्यंत्र येथे पावलो पावली रचली जात आहेत. अस्तित्वाला, अस्मितेला ठेचून काढण्याचे प्रयत्न होत आहेत. पंखात ताकत झेप घेऊन त्यांनी भराऱ्या मारायचा प्रयत्न केला पण पण ती ताकद नष्ट करण्याचे डाव तेवढयाच हुषारीने खेळले गेले. या सर्व षड्यंत्रातून बाहेर पड– ण्याचा मार्ग सापडला आहे त्यातलाच प्रकाशकिरण माझ्या जीवाची बलिदान शक्ति हा आहे. ही शक्ति आज ना उद्या प्रज्वलित होईल आणि माणसासाठी मानवतेच्या दिव्य संदेशाच्या वारसांची अधिसत्ता येईल तेथे कायदा माणसासाठी असेल, धर्म माणसा– साठी असेल, धर्मासाठी माणसं असणार नाहीत आणि त्याच दिवसासाठी हजार मरणं भोगायला मी हसत मुखानं तयार आहे.

(इतक्यात घडयाळाचे टोले पडतात पोलिस खडबडून जागा होतो राधा आपल्या विचारातून भानावर येते)

पोलिस – चला मरणापूर्वी आपली अखेरची इच्छा जेलर साहेबांना सांगा.

राधा – मला यायचं नाही पण एकच इच्छा आहे या तुरुंगाची जरूरी नाही अशी न्याय मंदिरे या देशाच्या मातीत गाडली जात आहेत त्याना जीवन द्या.

बुद्धं सरणम् गच्छामि ।
धम्मं सरणम् गच्छामि ।
संघं सरणम् गच्छामि ।

○ ○

# ‘ आम्ही क्रिकेट खेळतो

क. बा. नार्वेकर
(बी. ए. भाग १)

एप्रिल महिना होता. बाहेर ऊन मी म्हणत होते. मी ही ऊन म्हणूनच बाहेर पडायला धजावत नव्हतो. अंगाची अक्षरशः लाही लाही होत होती. मन रमत नव्हतं. अशा वेळी अन्या, पक्क्या, संभ्या आणि बाबशा या चौघांचं शिष्टमंडळ येऊन धडकलं. सुगीचा हंगाम संपल्यामुळे ही चौकडी तशी रिकामीच होती. अन्या बी. ए. होऊन चार चौघासारखाच बेकार हाता, संभ्या मॅट्रीकला फक्त पाचवेळा बसून शेवटी त्याने नाद सोडला होता. पक्क्या आठवीत असताना पी. ई. च्या शिक्षकाला शिव्या दिल्यामुळं त्याला शाळेतून हद्दपार केलेलं तर बाबशा हा अडाणी असूनही हिरोसारखा वागणारा रंगेल माणूस. अशी ही चौकडी माझी खास दोस्तमंडळी होती. चौघांनाही गावात काही तरी नवीन करावे असे वाटायचे. परंतु त्यांच्या हाती यश हे आलेच नाही. गावात त्यानी पुढाकार घेऊन तरूण मंडळ स्थापन केले. गावात राजकारणाच्या दोन पाटर्या असल्यामुळे त्यांचे जोडे खाऊन तरूण मंडळ बरखास्त झालं. नव्हे केलं.

त्या शनिवारी सुट्टी असल्यानं मी घरीच होतो चौघेही माझ्याजवळ टेकले.

त्यातला बाबशा म्हणाला, ‘काय रं के बी ?’ अन्या, पक्क्याचं ऐकून बाबशा मला केबी म्हणायचा.

‘गावात काय तरी नवीन करायचं म्हणता.’

‘करु या की.’ नेमकं काय करायचं याचा अंदाज घेत मी म्हणालो

‘नुसतं करू या की नव्हं, तू बी त्यात भाग घ्यायला पाहिजेस.’ घाम पुसत पक्क्या म्हणाला.

पक्क्याचं खरंच होतं आतापर्यंत त्यांनी केलेल्या उलाढालीमध्ये मी भाग घेतलेला नव्हता.

‘गावात क्रिकेटची टीम काढावी म्हणतोय.’ अन्या म्हणाला.

‘खरं आज शनिवार’ मी

‘च्यायला, त्याला बी ‘काय म्हूर्त लागतोय व्हय ?’ मानेला रुमाल बांधत बाबशा म्हणाला.

‘तसं न्हवं, न कर्त्याचा वार शनिवार, असं आपल्याकडं हाय म्हणून म्हणतो.’ मी शनिवारची अडचण सांगितली.

‘ती म्हण राहयली पुस्तकात.’ अन्या म्हणाला.

‘बाकी हा खेळ खर्चाचा अन् धोक्याचा आहे हं.’ मी पहिला बंपर सोडला.

‘आरं, मानसानं अवघड अन् धोक्याचं असलते करायचा प्रयत्न करावा,’ इतकावेळ तुटलेलं बटण शोधणाऱ्या संभ्यानं माझ्या कानात अनमोल विचार ओतले.

‘बरं, मग काय करायचं म्हणता ?’ मी.

‘आता आणि काय करायचं, वर्गणी काढा की, नऊ जण तरी तयार हाईत.’ पक्क्या म्हणाला.

‘मग किती-किती वर्गणी काढायची ?’ मी मनात वर्गणीची धास्ती घेऊन विचारले.

‘धा-धा काढा की’ अन्या सहज बोलावा तसा बोलला. लेकाचे सारे बडया बापाचे बेटे होते.

‘दहा-दहा जास्त होतात, पाच-पाच काढू नंतर कमी पडल्यास पहाता येईल.’ मी धडधडत्या छातीने म्हटले.

‘बरं पाच रुपये काढ.’ अन्या लगेच घोडयावरच बसला.

‘अरे साऱ्यांचं जमा तरी करा की, साऱ्यांचे विचार तरी घ्या.’ मी म्हणालो.

'आता आणि कसला विचार घ्यायचा ? काढ-काढ पाच रुपये. तुझ्यापासूनच सुरवात होऊ दे.' अन्या.

मी मुकाट्यानं घरात वहीसाठी दिलेल्या पैशां-तील पाच रुपये काढून अन्याकडे दिले.

अन्यानं ते तात्काळ खिशात घातले.

'हं, आता सांग टीमचं नाव काय ठेवायचं ?' पक्क्यानं जन्माला येण्याआगोदर बारसंच करायचं ठरवलं.

'आधी सुरुवात तरी होऊ देत. नंतर काही तरी ठेवता येईल.' मी कंटाळून म्हणालो.

'अँ हं, करायच तर सगळ पद्धतशिरच.' पक्क्या पद्धतर बोलशीला.

'काय तरी ठेवा. माझं काही म्हणणं नाही.' आता मी वैतागलो होतो.

'बाबशा सुचव रं एखादं नाव.'पक्क्यानं शहाण्या माणसावर ही जबाबदारी सोपवली.

'गावगुंड येलेवन्न ठेऊया ?' कुठंतरी स्टार ११, प्रेसिडेंट ११ अशी नावं ऐकलेल्या बाबशानं तात्काळ नाव दिलं.

'हात् तिच्या लेका, काय नाव ठेवला बघ. बाकी शेन काढणाऱ्याला अशीच नाव सुचायची खरं.' असा शेरा मारून अन्या म्हणाला.

'असं करू सुपर ११ ठेऊ.'

साऱ्यांनी मान डोलावली.

प्रवर्तक अन् संस्थापक म्हणून अन्याने अर्थातच कर्णधारपद आपल्याकडे घेतले.

'बरं आम्ही सोमवारी बेळगांवला जातो साहित्य आणायला. तोपर्यंत सगळ्यांची वर्गणी जमा होईल. उठता-उठता अन्या म्हणाला.

सोमवारी अन्या आणि पक्या दोघेही पहिल्या गाडीने बेळगांवला गेले

आम्हांला साहित्याची उत्सुकता लागली होती. आम्ही संध्याकाळी एकत्र जमलो. दोघेही पिक्चर-बिक्चर बघून रात्री नऊला आले. आम्ही साहित्याची चौकशी केली.

त्यावर अन्या म्हणाला. 'अरं झाडून पाक बेळगांव पालथी घातले. परंतु बॅटीच नाहीत. एका ठिकाणी होत्या परंतु त्या हलक्या होत्या आणायचं तर चांगलच साहित्य आणायचं. दोन दिवसात फुटून जाणाऱ्या बॅटी काय करायच्या ?'

हे सांगत असताना पक्या मात्र तोंड बाजूला करून हसत होता.

'मग साधारण किती खर्च आला ?' मी अंदाज घेत विचारले.

'गाडी खर्च, जेवणखाण जाऊन बॅटीच तेवढं पैसे उरल्यात.' पक्क्या म्हणाला.

'म्हणजे आणखी वर्गणी काढावी लागणार तर.' मी कपाळाला हात लावत विचारले.

'म्हणूनच मी म्हणत होतो की, धा-धा काढा म्हणून.'

अन्यानं मला माझी चूक दाखवून दिली.

साऱ्यांना क्रिकेटचे इतके वेड लागले होते की, दोन दिवसांत एखाद-दुसरा सोडल्यास परत पाच-पाच रूपये वर्गणी दिली.

'उद्या आम्ही कोल्हापूरला जातो.' अन्या म्हणाला.

'कोण कोण ?' मी मनात खर्चाचे बजेट ठरवत विचारले.

'आणि कोण ? मी आणि पक्याचकी' अन्या.

तर काय, आणखी कुणाला ठाऊक असणार यातलं असं मनात म्हणत मी विचारलं.

'एकटा कुणीतरी गेलं तर चालणार नाही ?'

'त्याचं असं हाय,' अन्या समजावून सांगू लागला.

'मी बी. ए. झालो म्हणून काही मला या साहित्यातलं ज्ञान नाही. पक्क्याला ते सारं ठाऊक हाय'

'मग पक्क्याच जाऊ दे की,' बाबशा म्हणाला.

'परतु पक्क्याच्या बापाला तरी कोल्हापूर ठाऊक हाय का?' असा युक्तिवाद करून परत दोघेही कोल्हा-पूरला गेले. जातेवेळी मात्र रिकाम्या हातानं परत न येण्याची ताकीद देण्यास आम्ही विसरलो नाही.

अखेर साहित्य मिळण्यास उशीर झाला म्हणून की ते मिळवण्यासाठी वशिला लावावा लागला म्हणून

कोण जाणे, त्यांना त्या दिवशी मुक्काम टाकावा लागला.

दुसऱ्या दिवशी मोठे अवघड कार्य केल्याच्या आविर्भावात दोघेही साहित्यानिशी दाखल झाले.

आणि तो सोनेरी छे रोजच्या सारखाच किरमीजी लाल दिवस उगवला आम्ही सारे जेऊन खाऊन दहाला माळावरती गेलो अन्या गदाधारी भीमासारखा खांद्यावर बॅट घेऊन सर्वांपुढे होता.

कॅप्टन अन्याने साऱ्यांना नियम व अटी सांगितल्या. मग आमच्यात आधी बॅटींग कोण करायची यात वाद लागला शंकऱ्या आणि बाबशा दोघेही बॅटीभोवती झोंबत होते. तेवढ्यात संभ्या म्हणाला, "ए शंकऱ्या, अजून तू पूर्ण वर्गणी दिला नाहीस. तीन रुपये आठ आणे दिलास ते ही दोन हप्त्यात."

तसा शंकऱ्या शरमून मागे सरला.

अन्यानं साऱ्यांना आपापल्या जागा ठरवून दिल्या. संभ्या हंपायर झाला. बाबशा बॅटींग करू लागला. दुसऱ्या बाजूला पक्क्या उभा राहिला. मी पहिल्या स्लीपमध्ये उभा राहिलो. अन्यानं आपल्याकडे चेंडू घेतला.

अन्यानं पळत येऊन पहिला चेंडू टाकला त्याचा पहिला टप्पा विकेटकीपरच्या पाठीमागे चार मीटरवर पडला. हंपायर झालेल्या संभ्याला हा वाईडबॉल, नोबॉल की कसला बॉल कळेना. अन्यानं दुसरा चेंडू टाकला. बाबशानं मारलेला तो चेंडू उंच उडाला. तसा दुसऱ्या बाजूस उभा असलेला पक्क्या कॅच घ्यायला धावला.

'ए लेका, बॅटस्‌मन असून कॅच घ्यायला जातोस?' कॅप्टन महाशय उर्फ बी. ए. ऑनर्स ओरडले.

हातात आलेला चेंडू टाकून पक्क्या पळाला.

अन्याचं पहिलं षटक तसं सणसणाठी गेलं एक ही धाव न देता त्यानं प्रत्येक चेंडू वेगवेगळ्या प्रकारे टाकले.

त्यानंतर थोडा अनुभवी आणि वेगवान समजला जाणारा राम्या बॉलींगला आला.

त्यानं पहिला चेंडू अगदीच मंद टाकला. बाबशानं जोरात फटका मारला. शंकऱ्या चेंडू माग धावला. बाबशानं पळून पाच-सहा धावा काढल्यातरी शंकऱ्या काही चेंडू टाकायचं चिन्ह दिसेना.

'ए शंकऱ्या, लवकर टाक की', सिलीपॉईंटवरचा सिली म्हाद्या ओरडला.

शंकऱ्या आपला सावकाश बिळातला चेंडू काढत होता. शंकऱ्या चेंडू टाकेपर्यंत बाबशानं पळून सोळा धावा काढल्या. आणि पहिल्याच दिवशी एका चेंडूत सोळा धावा काढण्याचा क्रिकेट इतिहासातील अद्वितीय विक्रम बाबशाच्या नावावर लागला.

दुसरा चेंडू बाबशा मारण्यासाठी धावला परंतु चेंडू बॅटला लागलाच नाही. बाबशा तोल जाऊन खाली आदळला. आणि हसण्याच्या नादात असलेल्या विकेटकीपरच्या तोंडावर चेंडू आदळला.

आता राम्यालाही चेव आला. त्यानं जोरात पळत येऊन वेगात चेंडू टाकला.

खट् असा आवाज आला आणि चेंडू स्लीपमधून पार झाला. 'ए केब्या, पळ की लेका' च्यायला धोब्यावर खेकसावा तसा अन्या माझ्यावर खेकसला.

मी चेंडूमागे धावलो. सीमारेषेच्या आत चेंडू अडवून तो तात्काळ फेकला. विकेटकीपरचं लक्ष नसल्यामुळं चेंडू त्याच्या डोकीत आदळला.

सारे विकेटजवळ घोळका करून उभे होते. मला संशय आला जोरानं फटका मारल्यामुळं बॅट तर फुटली नसेल ?

मी पळत येऊन पाहिलं बाबशा आडवा पडला होता. त्याचा चेहरा त्रिकोणी झाला होता. संभ्या त्याला वारा घालत होता. सारेच चिंतातुर दिसत होते. मघाशी खट् असा आलेला आवाज बॅटचा नसून बाबशाच्या पोटरीवर चेंडू आदळल्याचा होता. हे माझ्या आता लक्षात आले.

त्यानंतर आम्ही बाबशाला घेऊन घरी आलो. आम्हाला त्याच्या घरचा आहेर मिळाला. बाबशा आठ दिवस दवाखान्यात आणि पंधरा दिवस घरी पडून होता

या प्रसंगानं साऱ्यानीच क्रिकेटची धास्ती घेतली. कुणी क्रिकेटचं नाव तरी सोडाच त्या साहित्याचं काय झालं याची सुद्धा चौकशी केली नाही. साऱ्यांना क्रिकेट महागाचं आणि धोक्याचं आहे असं मी म्हटलेलं आता पटलं होतं.

मी परवा कॉलेजहून घरी जात असता अन्याचा लहान भाऊ म्हैशी चारत होता तेव्हा त्याच्या हातात मला एक स्टंप दिसली.

○ ○

# ' कै. प्रा. ना. रा. दुंडगेकर '

दत्ताजीराव देसाई
(बी. ए. भाग २)

"हिरण्यकेशी नयनांमधुनी आज अश्रुंचे पाणी
ताम्रपर्णीच्या ओठी उरली अर्धी मुरधी गाणी"

प्राचार्य बळवंत देशमुख यांच्या भावस्पूर्ती काव्यातील या ओळी प्रा. दुंडगेकरांच्या बाबतीत खऱ्या अर्थाने सार्थ ठरतात कारण माझा नि माझ्या-सारख्या असंख्यांचा दुंडगेकरांचेवरच विश्वास अढळ आहे. ते जगले ते विचाराने, कडाडले विचाराने, हसले ते विचाराने. या त्यांच्या गुणांचा स्पर्श झालेल्या शिष्यातला एक शिष्य म्हणून दुंडगेकरांचे आचार, विचार, उच्चार, कृती वक्तृत्व, कर्तृत्व या गुणांची झलक मी अभ्यासली त्या झलकेवरच सदोदीत यश नि त्याबरोबरच उक्ती नि कृती जोपासन्यास ती रूज-विण्यास शिकलो.

प्रा. दुंडगेकर स्वकर्तृत्वाने जगले त्यांचे जीवन हे दीपज्योतीसारखे होते. ज्योत संपली तरी त्यांचे कार्य चिरंतन असे दरवळत आहे. दरवळत राहील यात कोणत्याही प्रकारची शंका नाही. कर्तृत्वान माणसे ही त्या पिढीपुरती मर्यादित नसतात. अनेक पिढ्याचे कार्य करत असतात करून जातात. त्या त्यांच्या 'स्व' जाणिवेने ती अजरामर राहातात प्रा. दुंडगेकरांचे जीवन हे सर्वंकरातेने भारावलेले होते सामाजिक विषयावर मार्गदर्शन करत असताना ते ठासून सांगत की सामा-जिक कार्य करत असताना वैचारिक निष्ठा या महत्वाच्या असतात. त्यावेळी अहंकारी स्वार्थ असेल तर कार्य थांबते नि पिढ्या बरबाद होतात. सामाजिक ऋणाची जाणीव आंतरिक प्रेरणेतून हवी. हे समाजाचे समाजासाठी आहे नि आपण निरपेक्ष भावनेने कर्त-व्याची जाण ठेवून कार्यरत व्हावे कोणत्याही प्रकारचा स्वतःच्या स्वार्थासाठी भोग न घेता ज्योतीसारखेच कार्य करावे.

क्रांतीकारकांच्या विषयावर बोलत असताना क्रांतीची व्याख्या ते सांगत बलिदान गाठ म्हणजे क्रांती केवळ दगड गोटे मारणे इतकाच क्रांतीचा अर्थ मला अभिप्रेत नाही. अभ्यासपूर्वक समजून घेवून क्रांतीचा अर्थ लावावा समाज परिवर्तन करणेसाठी जुनी जळमटे फेकून टाकून अणुयुगातील टप्पे शोधावयाची सवय लागली पाहिजे लावून घेतली पाहिजे. त्यासाठी सतत जागृत राहून कार्य करावे लागते. असे केवळ सांगून थांबले नाहीत तर त्यानी कांही वैचारिक लेखन केले त्यापैकी 'शोक नाट्याची मूल तत्त्वे' हा ग्रंथ संपादित केला होता. डॉ. सु. गो. गोकाककर यांचे सहकार्याने हे संपादन सिद्ध झाले होते तो ग्रंथ अव्वल स्वरूपाचे एक संपादन म्हणून मानले गेले आहे.

त्यानंतर 'शोकनाट्याचे अंतरंग' हा स्वतंत्र ग्रंथ प्रा. दुंडगेकरांनी प्रकाशित केलेला आहे. आज तो प्रकाशित झालेला ग्रंथ याच्या अभ्यासाला सुरवात केली ती. ते छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे सातारा येथे विद्यार्थी असल्यापासून आणि तदविषयक लेख-नाला प्रारंभ केला तो ते पंढरपूर महाविद्यालयात अध्यापक म्हणून रूजू झाल्यानंतर. या गोष्टीला आता नाही म्हटले तरी १४ ते १६ वर्षे सहज आली आहेत, वाईच्या 'नवभारत' मधून प्रा. दुंडगेकरांचे शोक-नाट्यावरील बहुतांशी लेख प्रसिद्ध झाले किंबहुना नवभारत' मधूनच त्यानी गंभीर नि वैचारिक लेखन केले.

विद्यार्थी दशेपासूनच सामाजिक वैचारिक वाचनाची प्रवृती. वैचारिक जीवन जगण्याची त्यांची विशेषवृती नि धडपड होती मूल्याधिष्ठीत विवेक बुद्धीवर आधारलेली त्यांची जाणीव महाविद्यालयाच्या आवारात चर्चा परिसंवादात जेव्हा केव्हा चर्चेचा फड पडे तेव्हा चर्चा आणि विनिमय दोन्हीही चाले या चर्चेत गंभीर विषयालाच प्राधान्य असे त्यातूनही नट नटयासंबंधी विषय निघालाच तर त्या विषयाला जीवदान नावाचा भागच नसे. विषय रंगणे हा भाग बाजूलाच. दुंडगेकर सारस्वताचा वारसा विद्यार्थी दशेपासून आजतागायत फारकत होऊ न देता सांभाळत आले. सहवासात होते त्यांना सांभाळणेस भाग पाडत आयुष्यभर स्वतःही ते हा वारसा फारकत न करता जगणार होते यात संदेह नाही. जे दुर्मिळ नि झपाटयाने वैचारिक धन विरळ होत चालले होते ते विरळ न करता प्रा. दुंडगेकरनी प्रथमपासून जगण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत रूजविले नि हुंकारत असताना पाहिले या धनाला कोणाचे खतपाणी मिळेल कोणी दया दाखवेल अशी याचना करत दिवस न कंठता स्वत.च खतपाणी घातले. स्वतःच्या तेजस्वी देखण्या डोळयाने आपल्या हयातीत ते दरवळत असलेले समाधानाने पाहिले असे देखणे जीवन खचितच माणसाच्या वाटयाला येते. माणूस आपल्या विचाराने देखणं जीवन जगत असतो. हे जीवनातील देखणेपण दुंडगेकरानी निश्चितपणे पाहिले आहे अशी माझी धारणा आहे. जगतात बरेच पण "The truth is stanger than fiction." कल्पना आणि सत्य यांच्यातले अंतर न शोधता माणूस ठरवतो एक नि नियती घडवते एक. माणूस नि नियती यात नेहमीच फारकत होते. पण प्रा. दुंडगेकरांचे जीवन हे त्यानी ठरवलेले नि हवे तसे घडवलेले जीवन होते. यातून निर्माण झालेली फळे गोमटी त्यांनी पाहिली नि कृतार्थ झाले परिस्थितीचं कृपण न मानता परिस्थितीचा जन्माने दास असूनही परिस्थितीला दास बनवणारा हा मेरुमणी जीवनभरात वाकला नाही, दबला नाही, तर उभं जीवन वाकवला यात दुमत असायचं कारण नाही.

प्रा. दुंडगेकरांची वैचारिक प्रवृती त्यांच्या बोलण्या चालण्यातून जाणवत असे तशीच ती लेखनातूनही ठाशीवपणे बांधेसूध अगदी ठळकपणे उमटत असे. त्यातही ही शक्य तितका सर्व समतोल दूरदृष्टीने विचार हा या प्रवृतीच्या पाठीमागचा स्वभावविशेष असे 'शोकनाटयाची मूलतत्वे" "शोकनाटयाचे अंतरंग" या सारख्या समानशील ग्रंथात किंवा लोकशाही समाजवाद विषयक त्यांच्या लेख संग्रहात त्याची स्पष्ट नोंद आढळते. प्रा दुंडगेकर विद्यार्थी असलेपासून त्यांच्या विद्यार्थी पणात त्यांचे एक प्रकारचे जिव्हाळयाचे कार्यकर्तेपण नि त्यात असलेली समाज ऋणाची जाणीव त्या जाणिवेत असणारी डोळस आत्मीयता या साऱ्यातून कर्तेपणाची झलक दुंडगेकरांचे व्यक्तिमत्वात प्रकर्षाने जाणवत असे त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडण घडण ठोस विचार सरणीवर निश्चित सैद्धांतिक दृष्टीकोनावर आणि त्या आधारे समाजात परिवर्तन करून घेऊ पहाणाऱ्या कार्यक्रमावर उभी होती. या साऱ्या जाणिवेतून त्यांचे व्यक्तिमत्व घडले गेले होते. जन्मापासून साऱ्या थरावर नियुक्ती करण्याच्या फंऱ्यात अडकलेल्या नि कार्यरत झगडणाऱ्या 'एकाधिकारवादी शे. का. पक्षात विद्यार्थी दशेपासून तो अगदी प्रो. झालेनंतरही बराच उमेदीचा काल त्यांनी या पक्षात घालविला. आणिबाणीच्या काळात शे. का. पक्षाच्या 'मौनव्रता'चा वीट येऊन त्यांनी त्याकडे पाठ फिरवून 'जनता' पक्षाचा झेंडा खांद्यावर घेतला. तेथे ते निष्ठेने विचार करीत जिद्दीने झगडले. दुंडगेकरांच्या वैचारिक पिंडाचे भरण पोषण अलिकडे तिथेही घडण्याची फारशी शक्यता नव्हती हे दुंडगेकरांच्या स्वभावविशेषातून अनेकदा ठाशीवपणे दिसून आले आहे. त्यामुळे कांही वेळा त्यांना विफलता सहन करावी लागली. तरीसुद्धा त्यांच्या ठायी असणाऱ्या वर्धिष्णू बीजभूत गुणावर आधारलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्वाने नक्कीच यशाची सांगड घातली होती.

डॉ. एस. एस. भोसले 'शोकनाटयाचे अंतरंग' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात की प्रा. दुंडगेकरांनी पूर्वसूरींना वाट पुसत केलेला विनम्र प्रवास आहे. जीवनात आणि तदनुषंगिक कलांगामध्ये शोकनाटयाचा 'खेळ' पूर्वापार चालत आलेला आहे. हा खेळ आणि त्यांचे खेळीचे यांच्या (आणि त्यांच्या विषयीच्या इतरांच्या) परस्पर संबंधाचा, भाव विभावांचा, क्रिया प्रतिक्रियांचा, परिणाम आणि प्रभावक्षेत्र इत्यादी बाबींचा हा धावता आलेख आहे. ते पुढे म्हणतात दुंडगेकरानी एका हातात तत्वसूत्र आणि दुसऱ्या हातात

(पुढील मजकूर पान नं ११ वर पहा)

●

# ' सी. डी. देशमुख एक आदर्श व्यक्तिमत्व '

●

**जी. जी. कंगणी**
(बी. ए भाग १)

●

सी डी. देशमुख सक्रीय राजकारणात आणि समाजकारणात जेंव्हा होते तेंव्हा दुर्दैवाने आमच्या पिढीतील कित्येक जण जन्मले सुद्धा नव्हते किंवा आमच्या पैकी जे कोणी असतील ते तेंव्हा लहान असतील. त्यामुळे सी डी. विषयी आम्ही आमच्या पालकाकडून, शिक्षकाकडून जे कांही ऐकलं त्यांच्याविषयी जे कांही वाचलं त्यातुन सी. डी देशमुख हे व्यक्तिमत्व म्हणून मला जसं जाणवलं तसं मांडण्याचा हा प्रांजळ प्रयत्न आहे.

सर्वात प्रथम आम्ही शाळेत जेंव्हा प्रवेश घेतला तेंव्हा कुशाग्र बुद्धीमत्तेचा एक आदर्श नमुना म्हणून त्यांचं नाव आमच्या कानी पडलं. वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी त्यांना 'अमरकोष' मुखोद्गत होता. बुद्धीमत्तेशी व देशभक्तीशी त्यांचं अतुट नातं होतं. मॅट्रिकच्या परिक्षेत जशी त्यांना जगन्नाथ शंकर शेठ शिष्यवृत्ती मिळाली तशी १९१८ मध्ये लंडनला झालेल्या आय. सी. एस. परीक्षेतही ते प्रथम आले. त्यांच्या यशस्वी पदन्यासाचे उत्स्फुर्त अभिनंदन करतांना रा. ग. गडकरी यांनी त्यांना दिलेले आशिर्वाद त्यांनी भावी आयुष्यात सार्थ करून दाखविले.

'फुला उमलत्या ! वास यशाचा
नित्य नवा पसरी,
दरवळूनी मोहनी गुंगवी
ही दुनिया सारी ॥"

राष्ट्रीय लढ्यात भाग घेण्याची इच्छा जेंव्हा चिंतामणरावांनी लोकमान्याजवळ व्यक्त केली. तेंव्हा ते चिंतामणरावांना म्हणाले की, 'स्वराज्याचा कारभार चालविण्यास तुमच्यासारखे अनुभवी प्रशासक लागतीलच.' आणि मग देशमुखांनी सरकारी नोकरी केली. ती देशसेवा वृत्तीनेच एक उत्तम प्रशासक म्हणून त्यांची किर्ती केवळ राजकारणातच नव्हे तर जनता जनार्दनाच्या विशाल मंदिरातही गाजू लागली. ते अत्यंत कार्यक्षम प्रसारक होते. व तेही आर्थिक प्रशासक या नात्याने !

पण सी. डी. देशमुखांना अखिल भारतीय किर्ती मिळाली ती त्यांच्या अर्थमंत्रीपदाच्या राजीनाम्याने जो अलम दुनियेत गाजला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीस या एकाच चिंतामणी स्पर्शाने प्रचंड उजाळा व उजाळा प्राप्त झाला. मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा घाट त्यांनी उलथवून टाकला. त्यांचे हे ऋण महाराष्ट्र कधीही विसरणार नाही महाराष्ट्र स्थापनेच्या इतिहासात चिंतामनरावांची कामगिरी सुवर्ण अक्षरात नोंदविली जाईल या कृतीमुळे चिंतामणी महाराष्ट्राचा कंठमणी झाला. पण लोकप्रियतेच्या लाटेवर सदैव वाहण्यासाठी जे कांही लागते ते त्याच्यामध्ये नव्हते. कालांतराने ही लोकप्रियता ओसरू लागली.

स्वतःमध्ये रमणे व इतरांना रमवणं ही त्यांची वृत्ती नव्हती. म्हणूनच त्यांचे आत्मचरित्र इतकं रसाळ वाटत नाही. त्यांची वृत्ती ही आलिप्त आणि विश्लेषणात्मक होती. अर्थात तिला विद्यायकतेची जोड होती. म्हणूनच त्यांची रिझर्व बँकेतील गव्हर्नरची कारकिर्द गाजली. त्यांच्या कारकीर्दीत रिझर्व बँकेच्या कार्यपद्धतीत बऱ्याच सुधारणा झाल्या. रिझर्व बँकेचे युद्ध कालीन व स्वतंत्र पूर्व काळातील कार्य पंचवार्षिक

(पान नं ९ वरून पुढे)

उदाहरण, एका हातात मत आणि दुसऱ्या हातात त्याचे नांव त्यांचा ग्रथ याचे साक्षेपाने उपाय योजन केलेले आहे. यावरून खरोखरच दुंडगेकरांच्या डोळस जगण्याची ही साक्ष नव्हे काय ? हे कोण ना कबूल करील काय ? करेल यावर माझा विश्वास नाही. अभ्यासाने दुंडगेकरांचेकडे पहावे म्हणजे याची सार्थकता पटेल.

प्रा. दुंडगेकरांचे व्यक्तिमत्व हे विचाराने, उच्चाराने नि त्याबरोबरच कृतीने भारलेले होते. आणि म्हणून त्यांनी लिहिलेल्या 'शोकनाट्याचे अंतरंग या ग्रंथात ते लिहितात.

जीवनात तडजोड मला मंजूर नाही
जीवन मुल्याशी मी केव्हाही
तडजोड करणार नाही
जीवन मुल्यांचा पाठपुरावा करत करत
शोकांतिकेशी सामना देण्यात जे सामर्थ्य व
सुख आहे ते परिस्थितीला शरण जाऊन
लाचारी पत्करून सुखी होण्यात नाही
संकटाशी दोन हात करण्यातच माझं सुख
व स्वत्व पणाला लागावं
जेणे करून माझ्या सर्व उर्मी, शक्ती
खर्ची पडतील
शोकांतिकेचा नायक हाच माझा आदर्श
त्याच्यावरच मी अपार प्रेम केलं
सुखान्तिकेच्या नायकावर नव्हे !

प्रा. दुंडगेकरांच्या पोलादी मनाने लहान पणा-पासूनच स्वाभिमानाचे बाळकडू नम्रतेने प्यालल्याने नि त्याच नम्रतेने पचवल्याने जन्माला आलेली निर्भयता, विद्वता नि देशप्रेम, हे त्या पचवलेल्या 'स्व'च्या बाळकडूतूनच आयुष्यास पुरेल इतके जोपासले गेले. असा हा नामवंत, हिमवंत, आचारवंत, विचारवंत, शीलवंत, गुरु कर्णधार असूनही नियतीचा बळी होऊन अल्पायुषी ठरला. वेडी माणसेच इतिहास घडवतात असे बाबा पुरंदरे म्हणतात ध्येयाने वेडा झालेला हा तळपता धृवतारा २ सप्टेंबर १९८३ रोजी ढगाआड झाला. धृवताऱ्याने जगण्यात जी मजा आहे ती पुरेपूर लुटली नि आमच्यासारखे अनेक नावाडी या कर्ण-धाराने कुशाल चेंडू बणवले आणि म्हणूनच नम्रपणे वाटते. दुंडगेकरांचा एकेक जीवन धागा उलगडला तर त्या प्रत्येक धाग्यातून जीवनाचा अर्थ समजतो नि त्या पैलूमध्ये त्यांचे जीवन दर्शन घडते. विचार नि कृती यांच्यात फारकत न झालेल्या या मानवाच्या जीवन पटावर लिहावे तितके थोडच आहे. मनाची कवाडे उघडी करणारे देशमुख सरांच्या काव्यातील बोल राहून राहून आठवतात.

"शिवराजांचा हिरा हरपला मुकी झाली साधना
ज्योती भक्त ज्योतीस मिळाला ठेवून गेला खुणा"

सामाजिक वैचारिक क्रांतीचे गुण गात-गात अकाली गेलेल्या या हिऱ्याच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी परमेश्वर चरणी प्रार्थना करून लेखणी आवरती घेतो

○ ○

---

योजना आयुर्विमा महामंडळाची रचना व राष्ट्रियकरण दिल्लीतील इंडियन इंटर नॅशनल सेंटर ही सी.डी.च्या विधायक कर्तृत्वाची स्मारके आहेत. त्यांच्या कर्तृत्वास कार्यक्षम व चोख कारभाराची जोड होती. म्हणूनच आदर्श भारतीय प्रशासकांच्या यादीत त्यांचा नंबर वरचा लागेल. असे कार्यक्षम प्रशासक झाले असतीलही. परंतु चिंतामणरावांच्या नांवाभोवती एक जादूचे वलय निर्माण झाले होते. तसे इतर कोणाच्या भोवती क्वचितच झाले असेल.

सुविद्य, सुसंस्कृत कार्यक्षम व आजच्या काळात दुर्मिळ झालेल्या गुणांचे ते व्यक्तिमत्व होते. आव-डयाच्या जंजाळयात जितकेच रमत तितकेच कालिदास भवभूतीच्या काळात, बागकामात, अलिकडे तर ते फुलांच्या सुगंधात व ग्रंथांच्या सहवासात विशेष रमत. म्हणूनच कि काय त्यांचा जीवनग्रंथही सद्गुण सुगंधी असा होता. विद्वतेचा व सत्तेचा त्यांना कधीही गर्व चढला नाही. हे एक आश्चर्यच ! सर्वमान्य मान-सांच्या सेवेचा दृष्टीकोन अखेरपर्यंत त्यांचा ढळला

नाही. जे काम हाती घेत ते निष्ठेने पार पाडत. समाजवादाच्या पोकळ गप्पा न मारता त्यांनी केंद्रिय नियोजनाचा आराखाडा तयार केला. मध्यवर्ती बँकेचा पाया १९४३–४८ च्या दरम्यान मजबूत केला. त्यांची अर्थमंत्रीपदी असतानाही कारकीर्द यामुळे त्यांना अर्थचिंतामणी म्हणाल्यास वावगे ठरू नये.

आ. सी. एस. सेवेतही त्यांनी जी कर्तबगारी दाखवली तोच ठसा त्यांनी राजकारणात कायम ठेवला. खरं म्हणजे त्यांना राजकारणात स्वास्थ नव्हतं, राजकारण हा त्यांचा पिंड नव्हता. धर्म नव्हता, त्यांची प्रज्ञाही कविची किंवा स्वप्न दृष्टीची नव्हती. लोकशाहीचा पुरस्कार त्यांनी बुद्धीनिष्ठेने केला होता. त्यांची प्रतिभा ही स्थिर व निश्चित अशा कृत्यावर तार्किक पातळी गाठणारी होती. ही त्यांची मर्यादा एकदा लक्षात घेतली कि, मग त्यांचे संबंध आयुष्य हे त्यांच्या सहीसारखे सरळ व खुप दुरवर कसे पोहचले होते ते स्पष्ट होईल.

त्यांच व्यक्तिमत्व बहुरंगी होते. अर्थ शास्त्राच्या रूक्ष व्यवहारी वाळवंटात भरीव कामगिरी करित असतानाच रशीकत्व काव्याच्या ललित कुंजात व निसर्गाच्या विविध रंगात लिलया रंगत होते. 'मेघदूताचे' त्यांनी मराठीत केलेले भाषांतर हे त्यांच्या संस्कृत व मराठी भाषा प्रभुत्वाची साक्ष देते. त्यांचे गाढे संभाषण ही रसिकतेची व विद्वतेचो दर्शन घडविणारे असे सी. डी. एक उत्कृष्ट वाक्पट्टू म्हणूनही प्रसिद्ध होते संयुक्त महाराष्ट्राच्या संदर्भात राजीनामा देतांना त्यांनी केलेले संसदेतील भाषण केवळ अविस्मरणीय म्हणावे लागेल.

त्यांचा हजर जबाबीपणा, समय सुचकता संस्कृतवरील प्रभुत्व आणि वाक्पट्टूत्वही त्यांच्या वक्तव्यातून दिसून येते.

चिंतामणरावांचं व्यक्तिमत्व शद्वात पकडणं कठीणच आहे. कोणत्या शद्वात त्यांचे वर्णन करू ? भारताचा एक तेजोगोल ? कर्तव्यदक्ष कुशल प्रशासक, रामशास्त्री बाण्याचा लोकशाही पुजक ? अष्टपैलू पंडित ? चतुरत्न वक्ता व उत्कृष्ट ससंदपट्टू ? बहुभाषी कोशीद रशीद ? मराठी बाक्याचा पण जागतिक दृष्टीचा देशभक्त आदर्श नेता व समाजसेवक अखिल भारताचा कंठमणी. शांत, संयम, प्रसन्न व स्फूर्तिदायक व्यक्तिमत्व ? माझे तर शद्वच थिटे पडतात.

"कैसे करू तारीफ उनकी ?
मेरी शायरीमें अल्फाज कम है,
कमा करूँ तारीफ उनकी ?
वो तो तारीफसे बढ़कर है ।"

अशा या तर्कशुद्ध परखड आणि बिलोरी व्यक्तिमत्वास हा मानाचा मुजरा !!!

o o

## वेध

तुझ्या शर्मिल्या डोळ्यांनी
वेड मला लाविले
लोचनात अन् माझ्या
चित्र तुझे उमटले

सांगू शब्दात कसे
माझे मलाच कळेना
भास तुझा येथे तेथे
थबकल्या पावलांना

हाय ! तुझ्यावाचून हे
एकले कसे माझे मन
भेटीस्तव आता तुझ्या
तळमळे शब्दांगण !

**चिदानंद ठाणे**
बारावी साहित्य

# ' अपराध '

कु. ए. के. कुलकर्णी
(बी. ए. भाग १)

घड्याळात पाचाचे टोले पडले तेव्हा आपल्या टेबलावरील सर्व काम पूर्ण करून सविता आपल्या केबिनमधून बाहेर पडली. ड्रॉवरमधली पर्स घेऊन ती जिन्याच्या पायऱ्या उतरु लागली. त्यावेळी तिची चर्या कांहीशी गंभीर दिसत होती. यावरून तिच्या डोक्यात विचारांचे काहूर माजले आहे हे स्पष्ट समजत होते. आपल्याच नादात ती चालत होती तोच मागून आवाज आला.

'हॅलो सविता, जस्ट अ मिनिट.'

तिने मागे वळून पाहिले. तिला एकदम धक्का बसला कारण शशीकांत तिला बोलावित होता.

त्याच्या हातात कांही तरी दिसत होते. बहुतेक ती वस्तू म्हणजे शशीकांतच्या लग्नाची लग्नपत्रिका असावी असे सविताला वाटले. कारण, शशीकांतचे लग्न ठरल्याची कुणकुण तिच्या कानी आली होती किती तरी वेळ ती आपल्याच विचारात गुंग होती. परंतु स्वतःला सावरत तिने त्याला विचारले.

'काय शशी, कधी आलास ?'

'हा काय आताच तर येतोय, प्रथम तुझ्या घरीच जाणार होतो पण विचार केला, आधी तुला भेटून मगच घरी जावं. म्हणून इकडे आलो.'

'मग आता आलास तसं चल. आपण दोघेही चहा घेऊ अन् मग घरी जाऊ.'

सविता त्याच्या उत्तराची वाट पाहू लागली.

'आता मला चहा घ्यायला वेळ नाही. माझं एक महत्वाचं काम आहे' असे म्हणून शशीकांत एक क्षण-भर थांबला, व लगेच म्हणाला, 'हं हे घे.' असे म्हणून त्याने आपल्या हातातील पाकीट तिच्याकडे दिले.

सविताने पाकीट तेथेच फोडले अन् ती वाचू लागली. आपले वाचन संपताच तिने समोर पाहिले तर तिथे शशीकांत नव्हता. तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. तिने स्वतःला सावरले. ती अतिशय भावना-विवश झाली होती. तिच्या डोक्यात विचारांचे काहूर माजले होते. तशा अवस्थेतच तिने घर गाठले. घरी आल्या आल्या ती थेट बेडरूममध्ये गेली व दार लोटून मुसमुसून रडू लागली.

तिला समजलेली बातमी खरी ठरली होती. शशीकांतचं लग्न नक्की झालं होतं आणि या सर्वांला आपण कारणीभूत आहोत असे तिला वाटत होते.

दोन वर्षापूर्वीचा प्रसंग तिला आज पूर्णपणे आठवत होता.

सविता आणि शशीकांत एकाच कॉलेजमध्ये शिकत होते. दोघेही हुषार होते. प्रथम मिळविण्यासाठी त्या दोघांमध्ये सतत चढाओढ चालू असायची. कांही वेळा सविता क्रमांक मिळवी तर कधी शशीकांत तर कधी दोघांनाही समान मार्कस् मिळत असत.

त्यांच्या क्लासमधील सर्वच विद्यार्थी अभ्यासिके-मध्ये बसून अभ्यास करीत असत. सविता, शशीकांत देखील याला अपवाद नव्हते. अभ्यास करीत असताना निर्माण झालेल्या 'डिफीकल्टीज' ते परस्परांना विचा-रीत असत. त्यामुळे त्यांच्यातील आकर्षण वाढत गेले व त्याचे रूपांतर अखेर प्रीतीच्या नाजूक वेलीत झाले.

त्यांच्या प्रीतीची वेल बहरतच राहिली अचानक काही काम निघाल्यामुळे सविता चार दिवस गावी गेली तर शशीकांतला तेथं अभ्यास करीत बसणे कसे-सेच वाटे. त्याचे अभ्यासात लक्षही लागत नसे.

गावाहून आल्यानतर त्या दोघांची भेट होई तेव्हा शशीकांत सविताचा हात हळुवारपणे आपल्या हातात घेऊन म्हणे, 'सविता, या हातांचा स्वामी मात्र मीच होणार बरं का ? आणि तशी त्यांनी एकमेकांना वचने दिली. एकमेकांच्या आणाभाका झाल्या. त्या आनंदाने हुरळून जाऊन तिने हा बेत वडिलांना सांगि-तला. तेंव्हा तिच्या वडिलांना एकदम धक्का बसला कारण तिचे वडील पैशाचे खूपच लोभी असल्यामुळे त्यांनी सविताचे लग्न एका गर्भ श्रीमंत मुलाबरोबर ठरविले होते. हे तिला त्यांनी सांगितले तेव्हा सविताने आपला विरोध दर्शविला. तेंव्हा तिचे वडील म्हणाले 'अगं सविता, ऐक माझं तू एवढी श्रीमंता घरची मुलगी आणि तो कुठला एक साधा बँकमॅनेजरचा मुलगा. त्याच्याबरोबर लग्न करून तू का सुखी होणार आहेस ? तेथं तुला खूप त्रास सहन करावा लागेल. त्यामुळे तू खचून जाशील सवे !' त्यापेक्षा माझं ऐक आणि अविनाश बरोबर लग्न करून जन्मभर सुखी रहा.'

'पण बाबा, याविषयी मी ताईचा सल्ला घेऊ शकते का ?' सविताने मध्येच विचारले त्यावर 'अवश्य' असे म्हणून वडिलांनी परवानगी दिली.

तेंव्हा सविताने आपल्या मंजूताईला विचारले तर तिनेही तिला तोच सल्ला दिला.

ती म्हणाली, 'अगं सविता, तुला एवढंही समजू नये. आपल्यासमोर तो कुठल्या झाडाचा पाला. त्याच्याशी लग्न करून तू काय सुखी होणार ? निदान तुला दोनवेळचं जेवण तरी मिळेल का ? त्यापेक्षा तू बाबांच्या म्हणण्याप्रमाणे वाग त्यातच तुझे कल्याण आहे '

दोन्हीकडून तिला तोच सल्ला मिळाल्याने तिला बाबांचे म्हणणे पटू लागले व ती शशीकांतला हीन लेखू लागली. शशीकांत तिला डोळयांसमोर ही नकोसा वाटू लागला. त्यातच तिच्या वडिलांनी व ताईने शशीकांत बद्दल तिचं मन कलुषित केल्यामुळे त्यांच्या भेटीही मंदावल्या. दोन-तीन वेळा शशीकांतने आपली काहीतरी चूक झाली असेल म्हणून तिच्या घरी निरोप पाठवला. तरीही ती आली नाही म्हणून तो तिच्या घरी गेला. पण घरी असतानाही तिने नोकराद्वारे घरी नाही असा निरोप पाठवला. तेव्हा शशीकांत निराश झाला व त्याने तिचा विचारच सोडून दिला.

अविनाशबरोबर लग्न करूनही सविता सुखी झाली नाही. अविनाशच्या घरी तिला किती तरी छळ सहन करावा लागे. अशावेळी तिला आठवण येई ती शशीचीच.

अविनाशच्या घरी होणाऱ्या जाचाला कंटाळून तिने अविनाशशी घटस्फोट घेतला व घरी आली. पण तेथेही कोणाशी पटेना म्हणून दुसरीकडे खोली करून एकटीच राहू लागली. शशीबद्दल चौकशी करता तो दुसऱ्या गावी गेला असून त्याला बँक मॅनेजरची नोकरी मिळाल्याचे समजले. खूप खटाटोप केल्यानंतर सविता-लाही एका ठिकाणी नोकरी मिळाली.

त्या दिवशी जिना उतरताना याच गोष्टीचा ती विचार करीत होती तो अकस्मात येऊन ठेपला. जरी सविताने त्याचे प्रेम लाथाडले असले तरी त्याच नावाची एक मुलगी आता त्याची सहचारिणी होणार आहे हे सविताला सांगायलाच हवे असे त्याला वाटत होते.

हे सर्व आठवताच ती पुन्हा स्फुंदून स्फुंदून रडू लागली. तेवढ्यात पलिकडे कुणीतरी रेडिओ लावला व त्यातून सूर उमटले –

' वो दिल कहाँसे लाऊँ, तेरी याद जो भूला दें ।
मुझे याद आनेवाले कोई रास्ता दिखा दे ।'

★ ★

# ' प्रेम-परीक्षा '

कु. अलका आर. जाधव
(११ वी कला)

कॉलेजची परीक्षा संपून उन्हाळ्याची सुट्टी लागल्याने गांवी जायला मिळणार म्हणून अर्चनाला कोण आनंद झाला होता ! दोन वर्षापूर्वी ती या सातान्यास आली होती. खरं तर आई-बाबांना सोडून यायची तिची इच्छा नव्हती. पण बाबांच्या-अजित-बाबूंच्या शब्दाला मान देऊन कॉलेज शिकण्यास ती तयार झाली होती. आणि वर्षातून फक्त दोनदाच सुट्टीत तिला आपल्या नांदगावी जायला मिळत होतं.

नांदगांव व परिसरात अजितबाबू ही मोठी आसामी. घरची फॅक्टरी. मोठी शेती, निरनिराळ्या फळबागा. आणि मूळचेच गर्भश्रीमंत घराणे अर्चना ही अशा मोठ्या घरची पोर. फार लाडात वाढलेली कदाचित म्हणूनच अधिक हट्टी, जिद्दी पण पोरीत आत्मविश्वास मोठा दांडगा !

आज सकाळी लवकर उठून सर्व सामान भरून, अगदी वेळेवर ती स्टँडवर आली होती. बसमध्ये सामान ठेऊन ती बसली. हळूहळू बसमध्ये प्रवासी येत होते. वेळ होताच बस सुटली. पण एवढ्यात एक तरुण पळत आला आणि गाडीबरोबर पळत गाडी थांबवण्याची कंडक्टरला विनंती करु लागला. बस थांबली. तो तरूण आत आला आणि इकडे तिकडे जागा शोधू लागला. फक्त अर्चना जवळच एक जागा रिकामी होती. तेथे कोणी न बसल्याची खात्री करुन तो तेथे बसला. अर्चना खिडकीतून बाहेर पहात होती पण कधी कधी आत मान वळऊन त्या तरुणाकडे पाह-ण्याचा मोह ही तिला आवरता आला नाही. तो ही चोरट्या नजरेने तिच्याकडे पहात होता. नजरानजर झाली की दोघांना ही संकोचल्यासारखं व्हायचं !

ती विचार करू लागली, 'खरंच हा तरुण कोण ? कोठे जाणार आहे ? आपल्याच गांवी ? गांवी तर कधी दिसला नाही हा ! पण आपणच सद्या कुठे आहोत सारखे गावी ?

अखेर नांदगाव आले. अर्चना बसमधून उतरली. तिने रिक्षा केली अन् रिक्षावाल्यास करूणाच्या घरचा पत्ता सांगितला.

करूणा ही तिची बालमैत्रीण. एका निर्धन शेत-कऱ्याची मुलगी. खूप इच्छा असूनही गरीबीमुळे १० वी नंतरचे शिक्षण तिला घेता आले नव्हते. अर्चनाने तिचा सर्व खर्च करण्याची तयारी दाखविली होती. पण करूणाच्या स्वाभिमानी मनाला ते पटले नाही. शिवाय तिला घरची जबाबदारी सोडून जाणं पसंत ही नव्हतं. लहानपणीच आई देवाघरी गेलेली. लहान दोन भावंडं! सर्वांची जबाबदारी करूणावरच. आणि जबाबदारी पडल्यानेच तिच्यात अकाली प्रौढत्व आलं होतं.

अर्चना करूणाला घेऊन पुन्हा आपल्या घरी आली. करूणाला शहरातील गमती-जमती सांगत अर्चना गॅलरीत आली. बोलता-बोलता सहज तिचे लक्ष खाली रस्त्याकडे गेले. आणि तिला धक्काच बसला बसमध्ये भेटलेला तो तरूण तिच्याच घराकडे येत होता. अर्चना म्हणाली- 'करूणा, तोच हा तरुण. खाली जाऊन पहा. बहुधा आपल्याच घराकडे येतोय. मी वॉश घेऊन येते'

करूणा खाली आली. तोपर्यंत तो तरुण दर-वाज्यापर्यंत आला होता.

"कोण पाहिजे आपणाला ?"-करूणा.

"अजित बाबूना भेटायचं होतं"-तो

"ते घरी नाहीत. आपण कोण ?"–करूणा

तो म्हणाला– "मी सुभाष देशमुख. फॅक्टरीत मॅनेजरच्या जागेसाठी अजितबाबूंनी मला बोलावलं आहे."

"मग या ना आत. बसा. त्यांची मुलगी अर्चना आहे घरात. मी तिला बोलावते." करूणा म्हणाली. तेवढ्यात अर्चना खाली आली. तिला पाहुन त्याला एक धक्का बसला. करूणाने अर्चनाला त्याच्याबद्दल सांगितले. तो म्हणाला–"अजित बाबू कधी येतील ?"

"संध्याकाळी"–अर्चना.

"मग मी नंतर येतो." सुभाष म्हणाला.

"नाही नाही. थांबा ना ! तुमची गेस्टरुममध्ये सोय करून देते." असं म्हणून अर्चनाने घरगड्याला हाक मारली अन् सुभाषचे सामान गेस्टरुममध्ये ठेऊन त्यांना काय हवं–नको पाहण्यास सांगितले.

संध्याकाळी अजितबाबू आले अन् त्यांनी सुभाषला दुसऱ्या दिवशीपासून कामावर हजर व्हायला सांगितले.

अर्चना एकेदिवशी करूणाला म्हणाली– "करूणा सुट्टीचा वेळ कसा घालवायचा हा मला प्रश्न पडलेला होता. बरे झाले. करमणूक आली. आपण या तरुणाची गम्मत करू या. आपण दोघी यांच्यावर प्रेम करु या म्हणजे .. प्रेमाचे नाटक करु या तेवढाच वेळ जाईल अन् त्या तरुणाची कशी गम्मत होते ते पाहू" सरळ मनाच्या करूणाला ते आवडलं नाही. "तुला वेड तर लागलं नाही ना अर्चना ? शुद्धीवर येऊन बोलत जा." करूणा म्हणाली.

"अग पण आपण फक्त नाटक करायचंय. प्लीज. माझ्यासाठी शेवटी अर्चनाने करूणाला तयार केलं.

त्या दोघीही त्याच्याकडे पहात होत्या. हसत होत्या. पण शेवटी एके दिवशी त्याने ओळखले की या आपली गम्मत करताहेत. त्याने ही यांचीच गम्मत करायचे ठरवले असे कांही दिवस गेले हळूहळू दोघींच्याही लक्षात आले की आपण याच्यावर खरेच प्रेम करू लागलो आहोत. पण दोघींनी एकमेकांनी स्पष्ट असे कांहीच सांगितले नाही. सुभाषने त्या दोघींनाही वेगवेगळे भेटून रविवारी सायंकाळी ५ वाजता गावाबाहेरील तलावाच्या काठी भेटण्यास बोलावले. त्याप्रमाणे अर्चना गेली तर करूणा तिच्या आगोदरच तेथे हजर होती. करुणाला तेथे पाहून तिला आश्चर्य वाटले. दोघींनी त्यावेळी आपण का आलो हे स्पष्ट सांगून प्रेमाचे नाटक करता करता सुभाषवर खरेच प्रेम बसल्याची दोघींनी कबूली दिली.

आणि त्या दिवसापासून अर्चना करूणाचा मत्सर करू लागली 'करूणा काय सुभाषच्या लायकीची आहे काय ? दिसायला तर मीच तिच्यापेक्षा सुंदर आहे ना व्यवस्थित घर. ना दार माझ्याकडे काय कमी आहे ? रुप, पैसा, प्रतिष्ठा सगळं सगळं आहे. आपली लायकी लक्षात न घेताच ती सुभाषवर प्रेम करतेय. मी तिला प्रेमाचे नाटक करायला सांगितलं अन् खुळी खरंच त्याच्या प्रेमात पडली. माझंच चुकलं मी तिला तसं सांगायलाच नको होतं. पण मी सांगीतलं म्हणून काय झालं ? खरं तर करूणाने हे असं करायला नको होतं' असे किती तरी विचार अर्चनाच्या मनात थैमान घालत होते.

एके दिवशी तिने करूणाला घरी बोलाऊन घेतलं आणि म्हणाली– "करूणा, अग मी खरोखरच सुभाषवर खूप प्रेम करते आहे तुझं त्याच्याशी लग्न होणं शक्य नाही. मी करु शकेन. मॅनेजर जावई झाल्याबद्दल बाबांना खूप आनंद वाटेल. आणि विशेष म्हणजे त्यांना-सुभाषना– फॅक्टरीचे काम सतत पहावे लागणार असल्याने माझा सासरी जाण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही म्हणजे मला पतिच्या घरी जाण्यासाठी आई–बाबांपासून दूर होण्याची पाळी येणार नाही. तू माझी मैत्रीण आहेस. जीवश्चकंठश्च. माझ्यासाठी रस्त्यातून दूर हो. तू सुभाषचा नाद. सोड. करूणा, प्लीज. माझ्यासाठी !"

करूणाला खूप वाईट वाटले पण मैत्रीणीसाठी तिने आपल्या प्रेमाचा त्याग करायचा ठरविले त्या दिवसापासून ती सुभाषला भेटलोही नाही किंवा त्याच्याकडे साधे पाहिलेही नाही. सुभाष करूणाचे वागणे पाहून अस्वस्थ झाला. त्याला करूणा मनापासून आवडायची अर्चना सुंदर असली तरी तिचा नखरेलपणा आत्मप्रशंसी व हट्टी स्वभाव त्याला आवडत नव्हता

करूणा साधी भोळया स्वभावाची होती म्हणूनच ती त्याला आवडत होती.

एके दिवशी सुभाष फॅक्टरीवर जात असताना त्याच्या गाडीचा अपघात झाला. वळणावरती अचानक एक टेंपो त्याच्या स्कुटरवर येऊन आदळला. त्याला दवाखान्यात अॅडमिट करण्यात आले. त्याला पाहण्या- साठी अर्चना व करूणा दोघीही गेल्या होत्या. जाताना अर्चना आई-बापांच्या गळयात पडून खूप रडली. 'बाबा, सुभाषशी मी लग्न करायचं ठरवलं आहे. मला माहित आहे तुम्ही मला विरोध करणार नाही. पण बाबा आज हे कसं विपरित घडलं सुभाषला फार लागलं तर नसेल ना हो ?"

अजितबाबूंनाही अर्चनाचा निर्णय मनापासून आवडला. कारण त्यांच्याही मनात हेच होते. अजित- बाबू, अर्चना, करूणा दवाखान्यात आले. थोडया वेळाने सुभाष शुद्धीवर आला. अर्चना व करूणा दोघीही रडत होत्या. त्याने विचार केला- "दोघींपैकी आपल्यावर कुणाचे जास्त व खरे प्रेम आहे हे अजमावण्याची हीच वेळ आहे लगेच तो आपणाला कांहीच दिसत नस- ल्याचा अविर्भाव करून म्हणाला- "डॉक्टर. डॉक्टर मला कांहीच दिसत नाही हो ! माझी दृष्टी गेली का? मी आंधळा झालो, डॉक्टर मी आंधळा झालो."

अर्चना व करूणा दोघींनीही धक्का बसला. अर्चना एकाएकी उठून रूममधून बाहेर गेली. करूणा तिला परत घेऊन आली अर्चना म्हणाली- "करूणा, मी माझा निर्णय बदलला आहे. मी एका आंधळया तरुणाशी संसार करू शकत नाही तुला हवा असेल तर मी तुझ्या रस्त्यातून स्वतःहून दूर जाते आहे."

अर्चनाचे हे शब्द अजितबाबू व सुभाष दोघां- नीही ऐकले. सुभाष म्हणाला- "अर्चना, हे असं करू नकोस माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे."

सुभाषने विनंती करुन ही अर्चनाने आपला निर्णय बदलला नाही. ती निघून गेली. तिच्या पाठो- पाठ अजितबाबू ही निघून गेले. त्यांना खूप वाईट वाटले पण ते कांही करु शकत नव्हते. फक्त करूणा खाली मान घालून रडत उभी होती ती सुभाषजवळ आली. सुभाषला सर्व दिसत होते पण आंधळयासारखे चाचपून तो म्हणाला. 'कोण आहे ?'

"मी करूणा आहे सुभाष. माझं तुमच्यावर खूप प्रेम आहे. तुमच्या शरीरावर नाही, तुमच्या आत्म्यावर मी प्रेम करते आहे. माझा स्वीकार करा. ही सगळी दुनिया मी तुम्हाला माझ्या नेत्रानी दाखवीन. जन्मभर सेवा करीन. कधी कशाची उणीव भासू देणार नाही. सुभाष, माझा स्वीकार करा."

सुभाषच्या डोळयात अश्रू आले. आनंदाश्रू होते ते. त्याने पटकन् करूणाला जवळ ओढलं. अन् म्हणाला "वेडी ! तू ही फसलीस ना ! ते केवळ नाटक होतं मला सर्व कांही दिसते आहे. मी आंधळा झालो नाही. मला परीक्षा पहायची होती की दोघींपैकी कोण माझ्यावर जास्त आणि खरे प्रेम करते आहे. करूणा, प्रिये, तू परीक्षा पास झालीस. आता सुभाष जन्मभर- आणि जन्मभरच कशासाठी ?- जन्मोजन्मी तुझाच आहे."

किती तरी वेळ दोघं एकमेकाच्या जवळ होती. जेव्हा डॉक्टरनी दरवाजावर टकटक केली तेव्हा करूणा त्याच्यापासून दूर झाली.

कांही दिवसांनी सुभाष करूणाचे लग्न झाले. अजितबाबूंना मुळीच वाईट वाटले नाही त्यांना अर्च- नाचाच राग आला होता. अर्चना मात्र पश्चाताप करत होती आणि स्वतःच्या नशिबाला दोष देत होती.



# ' झपाटलेला '

अनिल वि. कुराडे
(बी. ए. भाग २)

अचानक झालेल्या माझ्या आगमनाने शांततेचा भंग केला जमलेल्या लोकांच्यामध्ये कुजबुज सुरु झाली. त्या सर्वांच्या नजरा माझ्याकडे वळल्या. अनोळखी माणसांच्या चेहऱ्यावर प्रश्नार्थक भाव दिसला तर ओळखीच्या नजरेत मदतीची याचना दिसली. धड-धडत्या अंत:करणाने संतोषच्या अंगाला हात लावून त्याला हाक मारली. विस्कटलेले केस, वाढलेली दाढी, अस्ताव्यस्त कपडे अशा अवस्थेत त्याने जेंव्हा माझ्या-कडं बघीतले त्यावेळी माझ्या हृदयाचा ठोकाच चुकला डोकं बधीर व्हायची वेळ आली. सर्वजण सुतकी चेहरे करुन बसले होते. आता पुढे काय करायचं यावर बोलायला मात्र कोणीच तयार नव्हते तेंव्हा मी तिथं बसलेल्यापैकी एकाला विचारले, ' काय होतं आहे याला ?'

" काय नव्हतं हो, बरा व्हता बघा. शनिवारी हृयेला उपास धरायची सवय. दिवसभर उपासी होता. संध्याकाळीच उपास सोडला भरपूर जेवला आणि हृयेच्या पोटात दुखाय लागलं. काय इशेष नसल म्हणूनशान तसच झोपला. रातचं पोटात जास्तच दुखाय लागलं. उलट्या सुरु झाल्या. पोटात काय व्हतं नव्हतं ते सगळं बाहीर गेलं. बर, येळ रातीची. डाक्टराकडं तरी कस जाणार. झालं. हृयेला म्हंजे रातीला कसला तो थारा नाही. एकसारख वाक ऽ वाक ऽ ऽ करत बकत व्हता. सकाळ व्हईपूतर हृयो गळी गारच पडला. मग फाटचं काय खरं नाही म्हणून एका वळकीच्या डाक्टराकडं नेल. तेनं लई येळ तपासलं, दोन सुयाबी टोचल्या. तरी काय कमीच ईना मग चांगल्या डाक्टराला दाकीवला तर त्यानं सांगीतल कि हृयेला कायबी झाल्यालं नाही. आणि आता सकाळपास्न कसंकसतरीच करायला लागलाय नव्ह काय ? बघाय लागला की एकीकडंच बघतूया. काय बोलत सुदीक नाही. कुणाला वळखतपण नाही. तुम्हाला तरी वळीकतोया का बघा ?"

शेवटी मलाच प्रश्न विचारून त्यान संतोषच्या आजाराची माहिती दिली आणि तो बोलायचं थांबला. आमच्या मध्येच बसलेल्या एका आजीबाईनं एकाद्या भूता-खेताच्या गोष्टीसारखी ही संतोषच्या आजाराची कथा मन लावून ऐकली होती ती म्हणाली, "मग हृयो आता कसकसच करतोया म्हणतोस तर बघा काय 'झपाटल-बिपाटलय' काय ? काय सांगाव बाबा कुठं कुठं उन्हातान्हाच दरविश्यावाणी फिरत असत्यात. 'वारंबीरं' झालं असंल. कुठल्या तरी देवरश्याला अनून दावा बाबा. चांगला हाता तोंडाला आल्यालं पोर हाय."

माझ्या मस्तकावर कुणीतरी घाव घातल्यासारखं वाटलं. आजीचा शब्द नि शब्द माझ्या कानांत लाव्हा-रस गोळ्यासारखा गेला. अंगाची लाही लाही झाली. अन् मीच झपाटल्यासारखा ओरडलो "हं ! झपाटलय त्याला, वारं झालय, त्याच्या मानेवर भूत बसलंय पण ते आहे बेकारीच ! त्याला वारं झालंय ते प्रेमभंगाच! त्याच्या मानेवर बसलेत ती माणसं, बेकारी !" असं बरच काही बराच वेळ बोलल्यानंतर माझा मीच शांत झालो. डोकं ठणकायला लागलं होतं. अनेक मैल चालून आल्यासारखं पायातील त्राणच गेलं. एकाद्या म्हाताऱ्या माणसासारखं मी माझ्याच गुडघ्यावर हात ठेवून उठलो. बाहेर येऊन अंगणात बसलो. संतोषच भूत माझ्या डोक्यात थैमान घालत होतं कांही केल्या संतोषचा विचार माझ्या मनातून जातच नव्हता.

संतोष, माझा मित्र. कॉलेजमधली चार वर्षं आम्ही एकत्रच काढली. दोघेही पदवीधर झालो. हातात

पदवीचे सर्टीफिकेट घेऊन नोकरीच्या शोधात निघालो. थोड्याच दिवसात आमचा अपेक्षा भंग झाला. विद्यापीठाने आम्हाला पदवी दिली होती परंतु पदवीने आम्हाला दोन्हीवेळच्या जेवणाचं पान सुद्धा द्यायला नकार दिला होता. आम्ही उपाशीपोटी फिरत होतो. अनेकांच्या हातापाया पडत होतो नोकरी मिळत नव्हती. बेकारीचं भूत आमच्या मानेवर बसले होते. ते काढायला 'देवरशी' मिळतच नव्हते. ते सर्वजण 'पांढरा डगला' घालून बगळ्यासारखे आमच्यासारख्या उपाशी तडफडणाऱ्या माशाची शिकार करायला बसले होते. 'समाजवाद' आणायला निघालेले आमचे नेते 'स्वार्थवादाचा' स्वीकार करून बसले होते. स्वतःच्या स्वार्थासमोर आमच्या सारख्या लाखो बेकार तरुणांचे त्यांना काहीही वाटत नव्हते

दिवस जात होते रात्री मोठ्या अमल्यासारख्या वाटत होत्या. नोकरी मिळत नव्हती. आत्महत्तेचा विचार मनात येत होता सर्व उपाय संपले होते. पार थकून गेलो होतो एक दिवस विमनस्क अवस्थेत दोघेही खोलीत बसलो होतो. पोस्टमनने माझ्या नावाचा एक लिफाफा आमच्याकडं दिला. धडधडत्या अंतःकरणाने तो फोडून वाचला नि आनंदाने बेहोश व्हायची पाळी आमच्यावर आली, कारण मला नोकरी मिळाली होती.

नवीन आयुष्याची सुरूवात झाली नोकरीचे एक वेगळंच सुख–समाधान उपभोगत होतो. लग्नाला आलेल्या, सौंदर्य असूनही केवळ 'हुंड्या'मुळे बरीच वर्षे लग्न न झालेल्या नववधूला लग्न झाल्यानंतर जसं मानसिक सुख मिळतं तसेच मलाही बरीच वर्षे बेकार म्हणून काढल्यानंतर मिळालेल्या नोकरीमुळे झाले होते. दिवस जात होते, महिने संपत होते. वर्ष केव्हा संपलं समजलंच नाही मी अन् संतोष दोघेही एकत्रच रहात होतो. त्याला अजूनही नोकरी मिळत नव्हती. दररोज पेपरमधल्या जाहीराती बघून, अर्ज करून, मुलाखती देणं चालूच होत तो अन् त्याच्यासाठी मी दोघेही प्रयत्नांची पराकष्ठा करत होतो यश मिळत नव्हतं. तो अजूनही 'बेकारच' होता.

सराईतपणे ऑफीसचं काम करत होतो टेबलवरची एक एक फाईल हातावेगळी करण्यात मग्न झालो होतो. अचानक डोकं दुखायला लागलं थोडासा तापही आल्यामूळं मरगळ आल्यासारखी वाटली म्हणून मी त्या दिवशी अर्ध्या दिवसाची रजा घेऊन विश्रांती घेण्यासाठी खोलीवर आलो. खोलीचा दरवाजा बंद होता. दारावर टक् टक् केली. आत काही तरी गडबड झाल्याचा आवाज आला दार लवकर उघडण्याचे चिन्ह दिसेना तेव्हा संतोषच्या नावानं हाक मारून मी आल्याची जाणीव दिली. थोड्या वेळानं दरवाजा उघडला. नेहमीप्रमाणं खोलीत प्रवेश केला नी .... माझ्या तोंडात 'आ' वासला समोरच दृश्य बघून माझा माझ्यावर विश्वासच बसेना संतोष..... संतोष एका तरुण मुली बरोबर ऐन दुपारी एकांतवासात खोलीत बसला होता. आता तो माझ्यासमोर एकाद्या अपराध्यासारखा मान खाली घालून उभा होता तर ती मुलगी. जिचं नांव होत 'सावली', जी आमच्या शेजारीच रहात होती ती भेदरलेल्या नजरेनं माझ्याकडं बघत होती.

आरोपीच्या पिंजऱ्यात उभ्या केलेल्या कैद्यासारखं भीतीपोटी मी काहीही न विचारता संतोषनं बोलायला सुरूवात केली. तो म्हणाला, "मी सावलीवर प्रेम करतोय खरं तर हे पूर्वीच तुला सांगणार होतो. परंतु मी असा बेकार त्यामूळं तुला सांगायचं धाडसच झालं नाही. आम्ही दोघांनीही नोकरी मिळताच लग्न करण्याचा निर्णय घेतला आहे. हवं तर तू हे सावलीलाच विचार."

तो बोलत होता नि मी ऐकत होतो. अगदीच श्रोत्याची भूमिका घेणं सुद्धा शक्य नव्हतं. कांहीही झालं तरी संतोष माझा मित्र होता त्यामूळं त्याच्या बऱ्यावाईट याचा विचार करायला हवा होता म्हणून मी संतोषला न विचारता सरळ सावलीलाच प्रश्न केला. "सावली, तू आमच्या शेजारीच असल्यामुळं तुझी माझी चांगलीच ओळख आहे. संतोष सध्या कोणत्या अवस्थेत आहे याची तुला पूर्ण कल्पना असावी. स्वभावाने तो फार चांगला आहे. दिसायला अगदीच मदनाचा पुतळा नसला तरी चारचौघात उठून दिसणारा आहे. पदवीधर आहे. तरी पण फक्त एवढ्याच गोष्टी तुम्हाला जगायला पुरेशा आहेत काय ?"

तुम्ही एकमेकांवर किती प्रेम करता हे मला माहीत नाही. तुम्ही घेतलेला लग्नाचा निर्णय बरोबर

आहे की नाही ते काळ ठरवील तरीपण निर्णय घेण्याची ही वेळ मात्र नक्कीच नव्हती असं मला वाटतं. "काळाच्या कानशीवर घासून पुसून घेतलेलेच निर्णय योग्य ठरतात. निर्णय नेहमीच वर्तमान काळात घेतले जातात, भूतकाळात जमा होतात, भविष्यकाळाची त्याला साथ मिळेलच असे काही सांगता येत नाही." याचा अर्थ माणसांनं भविष्य काळावर नजर ठेवून जगू नये असा नव्हे. शक्यतो आपण वर्तमान काळातच वावरायचा प्रयत्न केला तर त्याला वास्तवतेचे स्वरुप येते तुमच्या लग्नाच्या निर्णयाच्या बाबतीत म्हणाल तर तुम्ही फक्त भविष्याचाच विचार केला आहात. वर्तमान काळाला पूर्णपणे डावलून तुम्ही निर्णय घेतला आहात. याचा अर्थ तुम्ही खूप विचार केला आहात असं मी माझ्या नेहमीच वास्तवतेचा विचार करणाऱ्या मनाची समजूत करून या तुमच्या निर्णयाला मान्यतेबरोबर तुमच्या प्रत्येक सुख दुःखाच्या वेळी मला शक्य होईल तेवढी मदत करण्याचे वचन देतो

खूप बोलत होतो. घशाला कोरड पडली होती. बरंच बोलल्यामुळं हलकं हलकंही वाटत होतं. ती दोघही एकाद्या मुकस्तंभासारखी उभी होती. सावलीला तिच्या घरी जायला सांगितले आणि आधीच आजारी पडण्याच्या अवस्थेत असलेला मी विश्रांती घेण्यासाठी म्हणून झोपेची आराधना करत अंथरुणावर पडलो.

प्रेम आंधळं असतं. प्रेमाला डोळे नसतात हे सर्व काही कथा कादंबऱ्यामधून बऱ्याच वेळा वाचलं होतं आज प्रत्यक्ष पहात होतो. प्रेम आंधळं असलं, त्याला इतर काहीही दिसत नसलं तरी कमीत कमी पोटाचा विचार करायला वेळ असतो की नाही ? माणूस आंधळा असला तरी त्याच्या इतर गरजा त्याला डोळस करतात त्या भागवाव्याच लागतात. आंधळा माणूस सुद्धा पोटासाठी धडपडताना आपण पाहतो मग चांगले दिसत असताना सुद्धा ही माणसं 'प्रेमाच्या' नावाखाली पोटाचा विचार का करत नाहीत ? प्रेमाची भूक फक्त मानसिक, शारीरिकच असते काय ? हे जरी सत्य असले तरी शरीराला पोटाची भूक असते त्याचं काय ? प्रश्न अनेक समोर उभे रहात होते. उत्तर मात्र सापडत नव्हतं. स्वतःला कधी प्रेमाचा अनुभव आला नव्हता. संतोषला या प्रश्नांची उत्तरं विचारण्यात अर्थच नव्हता कारण तो प्रेम करत होता !

दिवस सरकत होते. महिने लोटत होते. काळ आपलं काम इमाने इतबारे करत होता. संतोषचं प्रेमप्रकरणाबरोबर नोकरीच्या शोधात वारंवार भटकणं सुरू होतं. नोकरी मिळत नव्हती. लग्न करता येत नव्हतं. निसर्ग आपलं काम करत होता. एक दिवस सावलीच्या घरी गडबड सुरू झाली. नवनवीन चेहरे दिसू लागले. शेवटी वास्तवतेचा विचार न करता घेतलेल्या निर्णयाचे व्हायचे तेच झाले. सावलीचं लग्न ठरलं. तिनं त्यासाठी विरोध केला की नाही माहीत नव्हते. आम्ही विरोध करूच शकत नव्हतो. कारण संतोष अजूनही 'बेकारच' होता. त्यानं ही बातमी ऐकल्यापासून जेवण सोडलं होतं त्याची अवस्था बघवत नव्हती. तरी पण सावलीच्या वडिलांना मी सांगू शकत नव्हतो. संतोषलाच काही तरी सांगून त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न करत होते.

एक एक दिवस वर्षाएवढा वाटायला लागला. अन् नेमकं याच वेळी मला ऑफीसच्या कामाकरिता आठ दिवस बाहेर जावं लागलं. जाताना त्याला खूप समजावलं. "काळानं दिलेला निर्णय तुला-मला सर्वानाच मान्य करावा लागतो काळाच्या न्यायालयात आपल्याला 'अपिल' करता येत नाही. त्याचा निर्णय हा शेवटचा निर्णय असतो एकाद्या राजकीय पुढाऱ्याच्या दबावामुळे आपल्या न्यायाधिशांनी बदललेल्या निर्णयासारखा काळ आपला निर्णय बदलत नसतो. आता इथून पुढे तरी कमीत कमी काळाशी इमान राखून निर्णय घे. स्वतःची प्रतारणा करून घेऊ नकोस "असं बरंच काही सांगून मी त्याचा निरोप घेतला. केवळ मनाविरूद्ध आठ दिवस कसे तरी बाहेर काढल्यानंतर काम संपताच मी परत आलो आणि खोली समोर येऊन पाहतो तर माणसांची गर्दी दिसली. पाया मधले त्राणच गेले. कसं तरी पुढं येऊन पाहिलं संतोषला माणसांनी गराडा घातला होता. तो खूप आजारी होता कसं कसं तरीच करत होता आणि सर्व जण त्याला काही तरी 'झपाटले' आहे असच समजत होती.

भुता-खेतावर माझा विश्वास नव्हता. संतोषनं चालवलेल्या ढोंगाचा मला खूपच राग आला. तो कसातरीच वागत होता. मान एका बाजूला कलती करून डोळ्यांची बुबळे विशिष्ट ठिकाणी आणून

(पुढील मजकूर पान नं. २२ वर पहा)

# ' मातृभाषा आणि राष्ट्रोत्कर्ष '

देवण एस. आर
(बी. ए. भाग २)

इ. स. १८१८ ला पुणे येथील शनिवार वाड्या-वरील भगवा झेंडा उतरवला गेला आणि इंग्रजांचे युनियन जॅक फडफडले. संपूर्ण भारत इंग्रजांच्या ताब्यात गेला आणि इंग्रजांचे राज्य सुरू झाले. इंग्रज हे प्रगत सुधारणावादी संस्कृतीचे प्रतीक होते हे इथे आल्यानंतर समाजात उलथापालथ होण्यास सुरवात झाली. यांत्रिक सुधारणा वैज्ञानिक संशोधन, सामाजिक आचार-विचार, शिक्षण. सांस्कृतिक धन, वेगवेगळ्या विद्या याबाबतचे ते एतद्देशीयांपेक्षा कितीतरी पुढारलेले त्यांनी इंग्रजी शाळा काढल्या. ग्रंथलेखनास उत्तेजन दिले. तात्पर्य, एतद्देशीयांवर एक नवीन परकीय इंग्रजी भाषा लादण्यांत आली. मातृभाषेवर घाला पडला. हा घाला नवीन नव्हता. पूर्वीच्या काळात मात्र मराठीला उर्दू अरेबियाचा जाच सहन करावा लागला होता. तथापी हे इंग्रजी परिवर्तन वेगळे होते. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत त्याचा संचार सुरू झालेला होता आम्ही इंग्रजी आचार-विचार, पोषाख, चाली रीती सारे सारे उचलले. चिपळूणकरांच्या भाषेत ही इंग्रजी भाषा म्हणजे वाघीणीचे दूध, त्यांनी आम्ही भारले गेलो. जे-जे इंग्रजांचे ते-ते सारे चांगले अशी आमची धारणा बनत चालली. आमचा देश, आमची संस्कृती, आमचा धर्म. आमची भाषा या सर्वांचा विसर पडला.

एका माणसाला किती भाषा शिकणे शक्य आहे ? आज सारे जग जवळ येत चालले आहे. वाहतुकीच्या साधनाने आम्ही दूरच्या प्रदेशाला बांधले गेलो आहोत राष्ट्राराष्ट्रात वैज्ञानिक स्पर्धा चालू आहे. प्रत्येक राष्ट्र आपल्या उत्कर्षाच्या नादी लागले आहे. तेंव्हा अनेक राष्ट्रांशी आपला संबंध येतो या राष्ट्रांशी व्यवहार करणे म्हणजे त्या-त्या राष्ट्राची भाषा येणे आवश्यक आहे. चीन, जर्मन, जपान अमेरिका, झेकोस्लाव्होविया यांच्या भाषा वेगवेगळ्या आहेत तेव्हा भाषा शिकणे आवश्यक आहे. प्राचीन संचिताची भाषा म्हणून संस्कृत, एकात्मतेसाठी हिन्दी, भगिनिचा परिचय म्हणून कानडी, गुजराती, बंगाली. तेव्हा जीवन संघर्षात टिकून रहायचे असेल तर या सर्व भाषा अवगत असणे आवश्यक आहे हे सर्व शक्य आहे काय? भारतात आज १४ भाषा प्रमुख आहेत. भाषांवार प्रांतरचना झाली आहे त्या त्या भाषेतील विद्यापीठे आहेत. तेव्हा बहुजन समाजांतल्या एका माणसाला या सर्व भाषा येणे कठीण आहे बहुजन समाजाचा उत्कर्ष व्हायचा असेल तर त्याच्या भाषेतून त्याचा उत्कर्ष होईल. सुशिक्षिताला चार भाषा येतात. म्हणून सामान्य माणसाला त्या भाषा येतील हे गृहित धरणे चुकीचे आहे. तेंव्हा बहुजन समाजाची भाषा, मातृभाषा; तिचे सामर्थ्य वाढविणे आवश्यक आहे. शाळांतून इंग्रजीची सक्ती चालू आहे. गेली १५४ वर्षे सक्ती चालू आहे. आम्ही बहुजन समाजातल्या विद्यार्थ्यांच्या या भाषा सक्तीमुळे आतोनात नुकसान झाले. त्याची बौद्धीक वाढ होऊ शकली नाही. 'इंग्रजी' म्हटले की तो घाबरतो. एस. एस. सी. ला इंग्रजी घेऊन पास होणाऱ्याची संख्या घटत चालली आहे. संस्कृत विषयाची उत्तरे इंग्रजीतून लिहावी लागतात. इतर विषयांत मार्क्स भरपूर आणि इंग्रजीत नापास असे सर्रास चालू आहे

आयरिश पुढारी डिव्हॅलेरो, देशाच्या स्वातंत्र्यापेक्षा चालू भाषेला महत्व देत आहे. ज्यू लोकांचा स्वतःचा देश नव्हता. त्याकाळी आपली हिडीस मातृ-

( पान नं. २० वरून पुढे )

तोंडाचा आ वासलेल्या त्याच्या या अवस्थेत त्याच्याकडं बघीतल्यानंतर खरंच भीती वाटायला लागायची शेजारी पाजारी तर अंधश्रद्धेवर विश्वास ठेवणारे त्यामुळं त्यानी संतोषला 'झपाटले' आहे हे सिद्ध करण्यासाठी देवरुयाला बोलवायला माणसं सुद्धा पाठवली. परिस्थितीही तशीच होती. चांगल्या डॉक्टरानीही त्याला कांहीही झालेलं नाही असं सांगितले होते. इंजेक्शन, औषधं दिली होती. तरीसुद्धा त्याच्या तब्येतीमध्ये काहीच फरक पडत नव्हता

मी ही घाबरून गेलो होतो. या चालवलेल्या 'भुता–खेताच्या' नाटकाची मला चीड आली होती. कोणाचे कांहीही न ऐकता मी संतोषला घेऊन डॉक्टरकडं गेलो. कोणत्याही प्रकारचा संकोच न बाळगता संतोषच्या बेकारीपासून ते प्रेमभंगापर्यंत संपूर्ण माहिती डॉक्टरना सांगितली. त्याचबरोबर त्याच्यावर आतापर्यंत किती डॉक्टरनी कसे नि केव्हा कोणते उपचार केले हे ही सांगितलं. डॉक्टरनी शांतपणे ऐकल्यानंतर त्याला तपासले आणि माझ्याकडं बघून म्हणाले की, "याला कांहीही झालेलं नाही फक्त एकाच प्रकारच म्हणजे स्टेमेटील (Stemitil)च इंजेक्शन ठराविक मुदत संपण्यापूर्वीच दिल्यामुळं त्यांची 'रीॲक्शन' आली आहे आता मी त्याला 'री ॲक्शन'वर इंजेक्शन देतो तो उद्या सकाळ पर्यंत बरा होईल." डॉक्टरांच्या बोलण्यामुळे मला खूपच धीर आला. आता मला संतोषला 'झपाटलेलं', 'लागीर' झालेल नव्हतं हे सिद्ध करता येणार होते. आता मला आनंदाच्या वेडोपीने झपाटले होते

o o

---

भाषा टिकवून धरली. दक्षिण आफ्रिकेत 'हाल' या मातृभाषेचा विजय झाला. विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, सावरकर, महात्मा गांधी यांनी मातृभाषेचे जयगान केले आहे.

तथापी एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. मातृभाषा हवी याचा अर्थ इंग्रजीचा द्वेष नव्हे. इंग्रजीतल्या विद्येचा, शास्त्राचा महिमा गायला जातोच.

ज्यांची भाषा गेली तो संपला. 'राज्य मिळवता येते पण गेलेली भाषा मिळवता येत नाही. तेंव्हा स्वभाषेला जिवंत ठेवणे, तिची वाढ करणे आवश्यक आहे स्वभाषा म्हणजे व्यक्तीच्या दृष्टीने स्वतःचा विकास आणि समाजाच्या दृष्टीने संस्कृती संवर्धन स्वभाषा म्हणजे पिढ्याना पिढ्यांचा ठेवा. संचित, स्वतःची भाषा अंतःकरणाचा ठाव घेते. परभाषा ही बुद्धीने जाणून घ्यावी लागते. इतर भाषांना जर विचार प्रकटीकरणाची, व्यवहार सौकर्याची भाषा म्हटले तर मातृभाषा म्हणजे खुद्द अंतःकरण इतर भाषा असतात. त्याप्रमाणे मातृभाषाही शाखा नव्हे, ती प्राण आहे. व्यक्तीचा विकास बौद्धिक आणि मानसिक मातृभाषद्वाराच होतो. म्हणून मातृभाषा ही सक्तीने अभ्यासाचा विषय झाली आहे. हे ऐच्छिक नव्हे. स्वभाषा म्हणजे स्वतःचे जीवन. जीवनाच्या सर्व शाखात तिचा अप्रतिम संचार चाललेला. धार्मिक, सांस्कृतिक तात्त्विक सर्वशाखा तिने व्यापलेल्या तेव्हा पर भाषेतील विज्ञान, कालसंवर्धन हे मातृभाषेतूनच चांगले अभ्यासले जाते. परभाषा जाणणारा म्हणजे सुशिक्षित आणि फक्त मातृभाषा जाणणार अशिक्षित असे वर्गीकरण. हे वर्गीकरण पुढे माणसा माणसात भेद पाडते दुहीला कारणीभूत होते. जे–जे लोक एक भाषा बोलतात ते–ते आमचे बंधू मग ते मुसलमान असोत, ख्रिश्चन असोत किंवा अन्य जातीचे असोत मातृभाषा ही राष्ट्रीय एकात्मता वाढविते एका भाषेमुळे आम्ही एकमेकांशी बांधले जातो.

मराठीचे क्षेत्रफळ आणि तिचा विस्तार मोठा आहे अद्यावत राजकारण आणि लोककल्याण तिच्यातून चालले आहे. ती दुय्यमभाषा ऐच्छिक म्हणून ठेवणे योग्य नव्हे. तिच्यात मोठी ग्रंथसंपत्ती आहे.

विवेक सिंधू, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, लीलाचरित्र, दासबोध, आर्याभारत, तुकारामाचे अभंग, भाऊसाहेबांची बखर, सभासदी बखर, रामजोशी प्रभाकरांच्या लावण्या केशव सुतांच्या कविता,

(पुढील मजकूर पान नं. २४ वर पहा)

# ' कौटिल्याचे अर्थशास्त्र '

सुरेश पेडणेकर
(बी. ए. भाग २)

प्राचीन भारतीय राजकीय विचारवंतापैकी कौटिल्य हा एक इ. स. ४ थ्या शतकांतील विचारवंत होय. कौटिल्य याला आर्य चाणक्य किंवा विष्णुगुरु या नावांनी देखील ओळखले जाते. 'अर्थशास्त्र' हा राजनीती शास्त्रावरील प्रसिद्ध ग्रंथ इतिहासाला ज्ञात आहे. म्हणून प्राचीन भारतीय राजकीय विचाराच्या इतिहासांत महत्वपूर्ण स्थान आहे. कोणतेही विचार हे ज्या-त्या काळांतील परिस्थिती नुसार उदयांस येतात व लोप पावतात. पण कौटिल्यासारख्या विचारवंताचे विचार आजच्या २० व्या शतकांत देखील मार्गदर्शक ठरतात. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र ग्रंथात राजनीती शास्त्रासंबंधी अत्यंत मूलगामी व वास्तववादी दृष्टीकोनातून विवेचन केलेले आहे. कौटिल्याच्या या ग्रंथानंतर भारतात राज्यशास्त्रांवर कित्येक शतके स्वतंत्र प्रतिभेचा असा काही ग्रंथ झालेला नाही.

कौटिल्य हा सम्राट चंद्रगुप्त मौर्य यांचा मुख्यप्रधान व गुरु होता. राजाने राज्य कारभार कसा करावा या उद्देशाने 'अर्थशास्त्र' या ग्रंथाची निर्मिती कौटिल्याने केली. आणि राजाला श्रेष्ठ मानले. कौटिल्याने आपल्या ग्रंथात दैनंदिन राज्य कारभारांत निर्माण होणाऱ्या विविध प्रश्नांची सोडवणूक राजकर्त्याने कशा प्रकारे करावी या संबंधीचे मार्गदर्शन केले आहे. मगध देशाचा राजा सम्राट चंद्रगुप्त मौर्य अधिकारावर येण्यापूर्वी नंद राजा अधिकारावर होता त्याच्या पदरी कौटिल्य प्रधान म्हणून काम करीत होता. पण नंद राजाने कौटिल्याचा भर दरबारात अपमान केला. तेंव्हा चाणक्याने अशी प्रतिज्ञा केली की, नंद कुलाचा नाश केल्याशिवाय शेंडीला गाठ बांधणार नाही. व ही प्रतिज्ञा पूर्ण करून स्वतः सिंहासनावर न बसता चंद्रगुप्त मौर्याला गादीवर बसविले.

'अर्थशास्त्र' या ग्रंथामध्ये ६००० श्लोकांचा समावेश असून १५ विषय विभाग, १५० प्रकरणे आणि १८० विभाग आहेत. यामध्ये शिक्षण विषयक चर्चा, शासकीय अधिकाऱ्यांची कर्तव्ये, कायद्यासंबंधी, गुन्हेगाराविरुद्ध करावयाच्या उपाययोजना राजदरबारांतील व्यक्तीची वर्तणुक, सार्वभौम राज्याचे घटक, परराष्ट्रीय राजकारणाची धोरणे, आपत्तीविषयी विचार, युद्धासाठी राजाने करावयाची तयारी युद्धांतील डावपेच, गणराज्याविषयी साम्राज्य धोरण, दुर्बल पक्षांवर मात करण्यांसाठी योजावयाच्या गूढ प्रक्रिया अशा पद्धतीने अनेक विषयांवर सखोल विचार व्यक्त केलेले आहेत.

कौटिल्याने राज्याच्या यशस्वीतेसाठी सप्तांगी सिद्धांत सांगितला आहे राजा हा पराक्रमी, बुद्धीमान, उदारमतवादी, कृतज्ञ व अनुभवी असावा. व अमात्य हे प्रभावशाली विविध कालांचे शिक्षण घेतलेले दूरदृष्टीचे असावेत. राज्यांमध्ये धर्मरक्षणाचे प्रमुख कर्तव्य करून राजाने आपल्या राज्याचा विस्तार करावा. शेती विकासासाठी राजाने नवीन गावे बसवावीत व नवीन जमीन पाण्याखाली आणावी राजाने लोकांचे जीवन व वित्त यांचे संरक्षण करून त्यांच्या सुखात सुख मानावे राज्य कारभारांमध्ये अशा प्रकारची अंतर्गत शांतता असावी तसेच राज्याच्या संरक्षणासाठी व सुरक्षिततेच्या दृष्टीने गुप्तहेर विभाग मजबूत असावा आणि राज्याच्या यशस्वीतेसाठी कुटील नीतीचे आवश्यक अंग आत्मसाथ करून योग्यवेळी वापरावे.

राजकारणाचे अविभाज्य अंग म्हणजे प्रशासकीय

(पान नं. २२ वरून पुढे)
चिपळूणकरांचे निबंध, हरिभाऊ आपटेंच्या कादंबऱ्या कोल्हटकर, शिरवाडकर गडकऱ्यांची नाटके इ. ग्रंथसंपत्ती आहे. मराठी ही संतसाधूंची साहवी वाणी आहे.

इंग्रजीबद्दल बरेच गैरसमज आहेत. इंग्रजी विज्ञानाची भाषा म्हणतात ती विश्वभाषा आहे असे सांगितले जाते ती ज्ञानाची खिडकी आहे. वाघिणीचे दूध आहे असे ऐकवले जाते. ती सर्व समजूत चूकीची आहे बहुजन समाज, स्त्री, दलित यांना आहे तसे ठेवण्याचा यांत एक कुटील डाव असावा किंवा अशी सांगणारी माणसे सुबद्ध तरी नसावीत विज्ञानांत जर्मन, रशिया, जपानसारख्या छोटया छोटया राष्ट्रांनीही खूप प्रगती केली आहे. 'केमेस्ट्री' सारखा विषय जर्मन भाषेत इंग्रजीमधील ज्ञानापेक्षा किती तरी मोठा आहे. युद्धशास्त्र नौकानयन इ. विषयांत रशियन भाषा अग्रेसर आहे प्रेम तत्वज्ञानांत फ्रेंच भाषा सर्वश्रेष्ठ आहे पोर्तुगीज भाषा भावना, उच्चसौंदर्य, श्रवणसुविधा यांत रूचीपर आहे चीन, जपान. रशिया जर्मन युगोस्लाव्हीया इ. राष्ट्रांत इंग्रजी भाषा नाही. पॅरिससारख्या जगप्रसिद्ध शहरांत एकच इंग्रजी दैनिक निघते.

जगांत इंग्रजी समजू शकेल अशांची संख्या ३६ कोटी आहे तर हिन्दी भाषा एक केल्या तर अशा हिंदुस्थानी भाषा समजणाऱ्यांची संख्या ४५ कोटी आहे. आपणच का हिंदूस्थानींची विश्वभाषा बनवण्याचा प्रयत्न करू नये ?

तेव्हा राष्ट्र वकासाला आवश्यक अशी मनोवृत्ती मराठी तयार करू शकते तिचे ध्येयही राष्ट्रीय विकास हेच आहे. राष्ट्राचा विकास केवळ इंग्रजाने होऊ शकतो हा भ्रम आहे. या भ्रमापोटी त्या भाषेची विद्यापीठांतून जी सक्ती चालली आहे त्यामुळे आम्हां युवकांच्य सक्तीची अकारण गळचेपी होत चालली आहे इंग्रजी आवश्य आणि मराठी ऐच्छिक हा काय प्रकार आहे ?

अरे ! आम्ही आमच्या आईला दुय्यम लेखू लागलो !
धन्य आहे आमच्या मडलेल्या बुद्धीची !

★ ★

अवस्था तेंव्हाही कौटिल्याने-राज्याच्या मदतीसाठी मंत्री व मंत्रीपरिषद असावी. यामध्ये मंत्री, पुरोहित सेनापती युवराज, राज्यवाड्यांतील अधिकारी खाजगी अधिकारी, तुरुंगावरील अधिकारी, महसूल अधिकारी, कोषाधिकारी, प्रदेशाधिकारी, सैन्यप्रमुख, राजधानी प्रमुख, न्यायविषयक, खाण-उद्योगाधिकारी, दंडपाल, मंत्रीपरिषदाध्यक्ष दुर्गपाल राज्य सीमाप्रदेशाधिकारी अशा पद्धतीने मांडणी केली होती. त्यानंतर कौटिल्याने आंतरराज्य संबंधाबाबत मंडलसिद्धान्ताद्वारे विजीगिषू अरी, मित्र, अरिमित्र, मित्रमित्र, अरिमित्रमित्र, उदासिन आदीपद्धतीने परराष्ट्रसंबंध व राज्यसंरक्षण यांच्या जवळचा संबंध आहे हे स्पष्ट केले. तसेच न्यायव्यवस्था उत्तम होण्यास समाजकंटकाचा बंदोबस्त, सार्वजनिक शिस्त बिघडवणाऱ्याविरूद्ध उपाय शोधणे आणि दंड, तुरुंगवास, फटके, मृत्यु इत्यादींचा समावेश कौटिल्याने केला आहे. न्यायाचा प्रमुख हा राजा असतो असे चाणक्याने प्रतिपादन केले आहे. राज्यांमधील प्रजेच्या संरक्षणाची ही जबाबदारी राजाने पार पाडावी लागते. राज्याची अर्थ व्यवस्था मजबूत करण्यासाठी शेती गायी पालन, व्यापार यांची काळजी घेतली पाहिजे. तसेच राज्यकारभार चालवण्यासाठी अर्थ हे राज्याचे प्रमुख अंग आहे म्हणून त्याकडे प्रामुख्याने लक्ष दिले जावे.

कौटिल्याचा अर्थशास्त्र या ग्रंथाच्या लिखाणावर अनेक विद्वानांचे एकमत झाले आहे आणि हे ऐतिहासिक दृष्टीकोनांतून सत्य आहे राज्य कारभाराच्या यशस्वितेसाठी वास्तववादी विचार व्यक्त केले आहेत. प्राचीन भारतीय राजकीय विचार वंताच्यामध्ये कौटिल्याचे स्थान अढळ आहे. जेवढे चंद्रगुप्त मौर्याच्या काळी विचार उपयुक्त होते तेवढेच आजही उपयुक्त आहेत व्यावहारिक राजनीतीचा पुरस्कर्ता या नात्याने कौटिल्याचे राज्य शास्त्रांतील स्थान हे असामान्य व श्रेष्ठ दर्जाचे आहे आणि म्हणून कौटिल्याचा अर्थशास्त्र हा अद्वितीय ग्रंथ राज्य कारभाऱ्याच्या यशासाठी वास्तवावर आधारलेला भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगांतील समाज जीवनाला एखाद्या दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करणारा आहे.

★ ★

# ' शेतकरी भविष्यनिर्वाह निधी '

**रोकडे एन. आय.**
(बी. ए. भाग २)

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जाणारा शेती व्यवसाय, आणि या व्यवसायात स्वतः कसून अन्नदेवतेला अवतार घ्यावा लावणारा शेतकरी, या व्यवसायाचा, शेतकऱ्याचा आणि एकंदरीत अर्थ–व्यवस्थेचा निकटचा संबंध असूनही शेतकऱ्यांच्यासाठी वृद्धापकाळी "भविष्य निर्वाह निधी". (Provident Fund) या योजनेचा लाभ अशिक्षित शेतकरी वर्गाना मिळू नये ही एक दुर्दैवी घटना, आजही आम्ही स्वातंत्रोतर काळात पहात आहोत अनेक औद्योगिक क्षेत्रात ही योजना लागू करून अनेक पांढरपेशी लोकांना वृद्धापकाळी स्वाभिमानाने जगता येण्याच्या सोयी सरकारने लागू करून दिल्या आहेत. पण शेत–कऱ्यांसाठीच अशी एकही योजना का लागू करू नये ? ही योजना शेतकरी राबवण्यात असमर्थ ठरेल काय ? तिचा शेतकऱ्यांना कोणताही फायदा होणार नाही काय ? शेतकरी आपल्या सेवेतून सेवानिवृत्त होत नाही काय ? राष्ट्राला शेतकऱ्याच्या सेवेचा फायदा होत नाही काय ? असे अनेक प्रश्न आजच्या विचार–वंतांना भेडसावित आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात अनेक संघटना स्वतःचे बळ वापरून स्वत.चे प्रश्न सोडविण्यासाठी चळवळी, मोर्चे हरताळ, संप या सारख्या मार्गाचा अवलंब करून स्वतःचे हित व जास्तीत जास्त सुविधा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. संख्येने कमी त्यामुळे संघटना तावडतोब निर्माण करून लेखणीच्या जोरावर पगार–वाढ महागाई भत्ते, विमा, लाभांश इत्यादी सोयींत दरमहा वाढ होते. आणि याच बरोबर घरभाडे, प्रवास भत्ता, वैद्यकिय सोयी औद्योगिक क्षेत्रातील कामगार सहजासहजी मिळवू शकतात. ते केवळ संघटनेच्या बळावर !

पण संख्येने जास्त, शिक्षणाने कमी असलेल्या अज्ञानी अंधकाराच्या पडद्याआड चाचपडत असणाऱ्या या मागासलेल्या शेतकरी वर्गाकडे शासनाने आपली नजर फिरवायला नको काय ? आयुष्यभर शेतात कष्ट करून शेवटी वयाच्या पंचावन्नाव्या किंवा साठी नंतर शेतकरी विनाकामी बनतो पण तो शेतातील कष्ठाची, म्हणजेच नांगर धरण्यासारखी कामे जरी न करता येण्यासारखा झाला. तरी तो जनावरे, शेळ्या, मेंढ्या राखण्यासारखी कामे करतच असतो. म्हणजे शेतकरी हा विनाकामी नसतोच किंवा तो कामातून मरेपर्यंत निवृत होत नाही. किंवा त्याला औद्योगिक कामगाराप्रमाणे निवृती वेतन हे कोणत्याही स्वरूपात मिळत नाही.

विषेशतः आजच्या शेतकरी समाजात निरक्षर बाप व साक्षर मुलगा असे ग्रामीण समाजाचे अर्धवट चित्र पहायला मिळते पूर्वीच्या समाजात वडीलधाऱ्या व्यक्ती विषयी आदर असे पण सध्या ती परिस्थिती राहिलेली नाही. वृद्ध बापाचा शहरी संस्कृतीशी फारसा संबंध येत नाही. उलट अर्धवट शिकलेल्या मुलाचा शहरांशी संबंध वाढत असून दोन पिढीतील अंतर वाढत आहे व शेवटी बापाला मुलगा मानत नाही ही शोकांतिका बापाच्या वाट्याला म्हातारपणी येते आहे मुलगा हा वारसा हक्काने बापाच्या इस्टेटीचा मालक होतो त्यामुळे असणाऱ्या मुलांच्यामध्ये बापाची इस्टेट विभागली जाते. व शेवटी प्रश्न उरतो म्हाताऱ्या आई वडिलांचा. आणि शेताचा एक तुकडा आई–वडिलांना देऊन मुले विभक्त होतात. वृद्धापकाळामुळे शेताच्या तुकड्यात कष्ठ करणे कठीण होते. म्हातारपणी सुद्धा

या शेतकऱ्याला सुखाचे जगणे म्हणण्यापेक्षा सुखाचे चार घास खायलासुद्धा महाग व्हावे लागते. याच्याहून अधिक भयानक परिस्थिती अनेकांच्या वाटयाला येत असते. स्वत:च्याच वारसाकडून बेवारशी ठरवून वृद्धाश्रमाच्या कोंडवाड्यात अडकवून घ्यावे लागते. व हलाखीचे आणि मानहाणीचे जीवन जगावे लागते.

यासाठी शासनाने व्यक्ती कोणता व्यवसाय करणार हे विचारात घेऊन, वयाच्या २० व्या वर्षा–पर्यंत त्या व्यक्तीला व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य द्यावे. मग ती व्यक्ती स्वत:च्या कुवतीप्रमाणे कोणताही व्यवसाय निवडेल. यातून जी व्यक्ती शेती व्यवसाय निवडेल. त्या व्यक्तीला त्या गावच्या सेवा सोसायटीत किंवा अन्य कोणत्याही सहकारी संस्थेत सभासद करावे. त्या व्यक्तीच्या नावे त्या संस्थेत १०० रु. भविष्य निर्वाह निधी या योजनेखाली जमा करावेत या प्रमाणे प्रत्येक वर्षी व्यक्ती १०० रु. व शासन १०० रु असे एकूण २०० रु. रक्कम त्या व्यक्तीच्या नावे पडत गेल्यास आणि ही योजना ३० ते ३५ वर्षापर्यंत म्हण–जेच व्यक्तीच्या पंचावन्नाव्या वर्षापर्यंत चालू ठेवल्यास त्या व्यक्तीला ४० हजारावर रक्कम भविष्य निर्वाह निधी म्हणून मिळेल.

सध्याच्या वाढत्या लोकसंख्येच्या आणि वाढत्या बेकारीच्या काळात "सुविद्य तरुणांनी शेती व्यवसाया–कडे वळावे" असे जरी म्हटले जात असले, तरी वृद्धापकाळ विचारात घेता आजचा सुशिक्षित तरुण एम्प्लॉयमेंट ऑफिसच्या दारात रांगेत उभा राहिलेला दिसेल. पण तोच हातात नांगर धरून शेतात काम करतो म्हणणारच नाही. कारण डोळ्यापुढे अशा अनेक कुटुंबांची जिवंत चित्रे पहायला मिळत असताना हा व्यवसाय आजची तरुण पिढी निवडण्यास थोडी संकुचित होईल.

पण शेतकरी भविष्य निर्वाह निधी प्रामुख्याने शेतकऱ्यांना मिळायला लागेल. त्यावेळी आजचा बुद्धी–जीवी तरूण वशीला लावून नोकरी मिळवण्याच्या पाठीमागे न जाता स्वाभिमानाने शेती व्यवसाय करेल. आणि सुशिक्षित तरूण ज्यावेळी शेती व्यव–सायाकडे वळेल त्यावेळी शेतीचे उत्पादन वाढलेले दिसेल सध्या शेती करणारा हा अशिक्षित शेतकरी तंत्राचा वापर करून शेती करत नाही. परिणामी शेतीचे उत्पादन कमी होते. पण तंत्राचा वापर करून शेती करत नाही. परिणामी शेतीचे उत्पादन कमी होते. पण तंत्राचा वापर करून शेती केल्यानंतर शेतीचे उत्पादन वाढेल व राष्ट्रीय उत्पन्न वाढण्यास मदत होईल. म्हणून एकंदरीत अर्थव्यवस्थेचा विचार करता "शेतकरी भविष्य निर्वाह निधी" एक वरदानच ठरेल.

★ ★


*ग्रंथ हेच गुरु...*

**चोखंदळ वाचकांची वाङ्मयीन अभिरूची वाढविणारे दक्षिण महाराष्ट्रातील अग्रेसर ज्ञान भांडार**



•

# अजब पुस्तकालय

सर्व प्रकारची पुस्तके मिळण्याचे शहरातील प्रमुख ठिकाण.

**प्रकाशक व पुस्तक विक्रेते.**

**भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर–४१६ ००२.**

फोन नं. २६७१०



# कविता

## शेतकरी राजा

शेतकरी राजा तुझी सदाच घाई रं
तुझ्यासाठी या जगी न्याय नाही रं

मनोभावे करिशी तू
धरणीची सेवा
कधी आराम
नाही विसावा

आनंदाचा ठेवा तुझा धरणी आई रं

ऊर फोडून
धान्य जमवलं
दमडीच्या आशेनं
बाजारी नेलं

तिथंही तुला तुडविती पायी रं

आयुष्याची तुझ्या
लागते रं वाट
त्यावर हा सारा
चालतोय थाट

परी याची कुणा जाण नाही रं

**– सी. बी. जाधव**
११ वी साहित्य

## वठलेला

उजाड माळावर एक
उभा आहे वृक्ष वठलेला
दखल नाही त्याची
तर ओळख आता कोणाला
तारुण्यात घोंघावणारा
त्याच्याच सलगीचा वारा
आता स्पर्श टाळत जातो
त्याच्या कुजकट शरीरा
भूतकाळात लोपलेल्या
अनेक आशा अनेक आठवणी
किलबिललेले पक्षी पक्षी
त्याचीच अनेक ती स्वप्न गाणी
आता तो कुढत
आहे एकाकीच उभा
आठवत असतात आज त्याला
अंगाखांद्यावरील पक्षांच्या सभा

**– दत्ता काळेबेरे**
बी. कॉम. भाग २

★ ★

## अबोलीचे घर

अबोलीचे घर
फुलत खुलत असते
तेव्हा तू
ज्वालांच्या स्वप्नांनी
सजत असतेस
प्रश्ना प्रश्नाने आयुष्य माझे
जळत असते
त्यात
प्रश्नचिन्ह लेवून
तू येतेस
आणि
अबोलीच्या घराचे
का स्वप्न सांगतेस ?

**– सुरेश कळेकर**
बी. ए. भाग २

## दान

चल रे केशा चल रे नाऱ्या
चला मळुया आज धान

कणसं येऊन पडल्यात खळघात
आणि टपोरं मोती भरल्यात
चला मळाया जोडूया दावन

यंदा सारं भागून उरतं
दोन हजार कर्ज फिटतं
चला देवीला घेऊया मागून

कष्ट केलंय मनापासून
हृर्ष्या गुलब्याच्या जोडीनं
चला रास भरुया कोंबडं कापून

पोरगी आलीय आता द्यायला
जागा आलाय हजार हुंड्याला
चला देऊया बार उडवून

धरणी आईची रे ही माया
मनापासून सारी राबूया
धरती मातेनं केलय दान

**– प्रताप शंकर खोत**
बी. कॉम. भाग १

## स्तब्ध

विमानातल्यांचं जगही फिरतं
मोटारीतल्यांची झाडेही पळतात
उन्हाच्या झळीत डोंगरही हलतात
पण…….
वास्तवात सारे स्तब्धच असतात
फिरून फिरून विरामात गातात

**– संजय सुतार**
१२ वी साहित्य

## नीट पहा

तराजूनं तोलणाऱ्या पत्थराच्या सौदागरा
तू उगाच छेद देतो आहेस भागाकाराला
कसं समजाऊ रे तुझ्या पदवीला ?
अश्रूंचं जर ॲनलिसीस करत बसलास
अन् तुला नुसतं सॉल्ट मिळालं...
त्यात जर हिमोग्लोबीन नाही सापडलं...
तर तुझं गणित चुकलं रे चुकलं
त्यात देखील सॉल्टच्या जाती आहेत बर !
प्रेमाचं–भीतीचं–दुःखाचं नि विरहाचं सॉल्ट
या साऱ्यांनाच तू एच् टू ओ म्हणणार ?
की चारींची बेरीज करुन मीन काढून
जीवनाच्या गुणाकारातून वजा करणार ?
तुला तुझ्या आयुष्याला मायक्रोस्कोप मधून
काही दिसतच नाही –
तसा प्रयत्नच केला नाहीस–तसा ?
अेकदा पहा ना
नीट पहा
पारिजातकाचं फूल दिसेल वेड्या !

**– के. ए. मुल्ला**
बी. एस्सी. भाग २

## पहाट

अंधाराची पाषाणहृदयी रात्र
त्यात
असंख्य जीव पडले उद्याची स्वप्ने पहात
रात्रीच्या परीट घडी इस्त्रीवरून
घुबडाच्या मळकट गीताचे पाय
चुरघळत फिरती रात्रीच्या वातावरणावरून
मध्येच गुडघ्यात पाय घेऊन पडलेली पहाट
